सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०३ एप्रिल २०२५ वर्ष तिसरे अंक ०२ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेस सरकारने दिल्लीतील १२५ मालमत्ता वक्फला दिल्या - अमित शाह

## वक्फ बोर्डाने कोल्हापूर, बीड जिल्ह्यांतील मंदिरांच्या जमिनींवरील केला दावा - ...तर आज वक्फ विधेयकात बदल करण्याची वेळच आली नसती!

नवी दिल्ली, २ एप्रिल - वक्फ विधेयकात २०१३ मध्ये जे बदल झाले, त्यामुळेच आज हे बदल करण्याची वेळ आली आहे. त्यावेळी काँग्रेस सरकारने दिल्लीतील लुटियन्स भागातील १२५ मालमत्ता वक्फला दिल्या. उत्तर रेल्वेची जमीन वक्फला दिली. हिमाचल प्रदेशात वक्फची जमीन सांगून मशीद बांधली. दान आपल्या संपत्तीचे केले जाऊ शकते, सरकारी जमिनींचे नाही. वक्फ एक प्रकारचे चॅरिटेबल एंडोरमेंट आहे. यात व्यक्ती पवित्र दान करते. दान अशाच गोष्टीचे केले जाते जी आपली आहे. सरकारी मालमत्ता अथवा इतर कुणाच्या मालमत्तेचे दान करता येत नाही, असे सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. यावेळी शाह यांनी, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची काही उदाहरणे दिली ज्यावर विरोधकांनी गदारोळ केला आणि त्यांच्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला.

वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले आहे. त्यावर दोन्ही बाजूने चर्चा, आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. अमित शाह म्हणाले, मी या विधेयकाच्या बाजूने बोलत आहे. मला वाटते, एक तर निर्दोष भावनेने अथवा राजकीय कारणांमुळे सदस्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत आणि ते पसरवण्याचे कामही सुरू आहे. मी काही गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करेन. वक्फ एक अरबी शब्द आहे. याचा इतिहास काही हदीसशी (इस्लामी धर्मग्रंथ) संबंधित सापडतो. आज ज्या अर्थाने वक्फ शब्दाचा वापर केला जातो, त्याचा अर्थ आहे अल्लाहच्या नावावर मालमत्तेचे दान. आम्ही आज जो अर्थ समजत आहोत, तो इस्लामचे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात अस्तित्वात आला.



एक लाख अडतीस हजार एकर जमीन भाड्याने देण्यात आली, खाजगी संस्थांची जमीन शंभर वर्षांच्या भाडेपट्ट्यावर हस्तांतरित करण्यात आली, विजयपूर गावातील १५०० एकर जमीन दावा करून वादात टाकण्यात आली. पंचतारांकित हॉटेल १२००० रुपये भाड्याने देण्यात आले. दरमहा १२००० रुपये दिले आणि सांगितले की हे पैसे गरीब मुस्लिमांचे आहेत. हे श्रीमंतांनी चोरी करण्यासाठी नाही. त्यांचे कंत्राटदार बोलतात. दरम्यान शाह यांनी महाराष्ट्रातील वक्फ बोर्डाने दावा केलेल्या दोन जमिनींचा उल्लेख केला. कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे या गावातील एका मंदिराच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे, तसेच बीड जिल्ह्यातील कंकलेश्वर मंदिराच्या जमिनीवर दावा केला आहे.

दुसरीकडे कर्नाटकात मंदिराच्या ६०० एकर जमिनीवर दावा केला. तसेच ख्रिश्चन समुदायाच्या मालकीच्या बऱ्याच जमिनीवर दावा केला. अनेक गट वक्फ विधेयकाला विरोध करत आहेत. अखिलेशजी, मुस्लिम बांधवांकडून सहानुभूती घेऊन काही फायदा होणार नाही. दक्षिणेकडील हे खासदार जे असे बोलत आहेत ते त्यांच्या क्षेत्रातील सर्व चर्चना संपवत आहेत. तेलंगणामधील १७०० एकर जमिनीवर आणि आसाममधील मोरेगाव जिल्ह्यातील जमिनीवर दावे करण्यात आले. हरियाणातील गुरुद्वाराची जमीन वक्फला सुपूर्द करण्यात आली. प्रयागराजमधील चंद्रशेखर आझाद उद्यानालाही वक्फ घोषित करण्यात आले. हे सर्व चालू आहे, वक्फ हा मुस्लिम बांधवांच्या देणग्यांमधून तयार केलेला ट्रस्ट आहे, सरकार त्यात हस्तक्षेप करू इच्छित नाही. लाखो कोटी रुपयांची जमीन आणि १२६ कोटी रुपयांचे उत्पन्न. हे आपल्याला उत्पन्नाचा उद्देश काय आहे ते सांगतात, असंही शाह म्हणाले.

अमित शाह यांनी स्पष्ट केले की, वक्फमध्ये कोणत्याही गैर-मुस्लिमाची नेमणूक होणार नाही. धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनासाठी गैर-मुस्लिमांना नियुक्त करण्याचा कोणताही विचार नाही. वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डची स्थापना १९९५ मध्ये झाली. हा कायदा मुस्लिमांच्या धार्मिक कामात हस्तक्षेप करतो, हे चुकीचे आहे. काही लोक अल्पसंख्याकांमध्ये भीती निर्माण करत आहेत आणि मतांसाठी खोट्या बातम्या पसरवत आहेत.

वक्फ विधेयक का महत्त्वाचे आहे, यावर शाह यांनी सांगितले की, वक्फचा कायदा म्हणजे कुणीतरी दान केलेली संपत्ती, तिचे व्यवस्थापन व्यवस्थित चालले आहे की नाही, कायद्यानुसार चालले आहे की नाही, हे पाहणे. दान ज्या कामासाठी दिले आहे, इस्लाम धर्मासाठी दिले आहे, गरिबांच्या मदतीसाठी दिले आहे, त्या उद्देशासाठी उपयोग होत आहे की नाही, हे पाहण्याचे काम हे विधेयक करते. या विधेयकामुळे वक्फच्या संपत्तीचे योग्य व्यवस्थापन होईल. तसेच, ज्या उद्देशांसाठी दान दिले आहे, ते उद्देश पूर्ण होतील, असे शाह यांनी सांगितले.

## वक्फ बोर्डाच्या भूमिकेवरून उपमुख्यमंत्र्यांनी विरोधकांना डिवचलं!

मुंबई : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत सुधारित वक्फ विधेयक सादर केले. सध्या लोकसभा सभागृहात या विधेयकावर चर्चा सुरू असून, सत्ताधारी याचे समर्थन करत आहेत. तर, विरोधक याला विरोध करत आहेत. याचबरोबर या वक्फ दुरूस्ती विधेयकावरून सभागृहाबाहेरही प्रतिक्रिया उमटत आहेत. अशात आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वक्फ विधेयकावरील भूमिकेवरून विरोधकांवर जोरदार टीका केली आहे.

वक्फ दुरूस्ती विधेयकावर बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, हे विधेयक मुस्लिम समाजाच्या फायद्याचे आहे. त्याचा त्यांनी विचार केला पाहिजे. पुढे पत्रकारांनी या विधेयकावरील ठाकरे गटाच्या भूमिकेचा उल्लेख करताच एकनाथ शिंदे म्हणाले, हे बघा, असली पळपूटी भूमिका कशाला घ्यायची. स्पष्ट भूमिका घ्या ना. तुम्ही गोष्टी जेव्हा फायद्याच्या असतात तेव्हा धरता आणि तोट्याच्या असतील तेव्हा सोडतात. विधानसभा निवडणुकीत ते १०० जागा लढले आणि २० जिंकले.

इथून पुढे होणाऱ्या महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही जनता त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. आता बघायचे आहे की, ते बाळासाहेबांचे विचार आणि भूमिका घेऊन पुढे जातात की, राहुल गांधी सांगतील तसे करणार. दरम्यान उपमुख्यमंत्र्यांच्या या वक्तव्यामुळे राजकारण तापणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

# राज्यसरकारचा निर्णय : जुनं वाहन मोडीत काढाल तर नवं घेताना मिळेल कर सवलत



मुंबई : वाहन खरेदी करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी. तुमच्याकडेही जुनी गाडी असेल तर ती देऊन नवीन गाडी घेताना तुम्हांला वार्षिक करामध्ये काही टक्के सवलत देण्यात येणार आहे. स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रावर परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणी पासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होत होती.

यापुढे एकरकमी कर लागू असणाऱ्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर ) काढल्यानंतर वाहन धारकास मिळालेले ठेव प्रमाणपत्र कर सवलतीसाठी पुढील दोन वर्षे वैध राहणार आहे. यात ज्या प्रकारचे म्हणजेच दुचाकी, तीन चाकी किंवा हलके मोटार वाहन मोडीत काढलेले असेल, त्याच प्रकारचे वाहन खरेदीनंतर नोंदणी करताना ही कर सवलत लागू होणार आहे. याबाबतची अधिसूचना जाहीर झाल्यापासून तीन वर्षांच्या आत असे वाहन स्वेच्छेने मोडीत (स्क्रॅप) काढल्यास ही कर सवलत मिळणार आहे.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? अजित पवारांनी केलं स्पष्ट

बीड : विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती सरकारने लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देऊ असे आश्वासन दिले होते.यावर आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड दौऱ्या दरम्यान एक मोठं आणि सूचक वक्तव्य केलं आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड दौऱ्यावर आहेत. यावेळी एका कार्यक्रमा दरम्यान तरुणांशी संवाद साधताना अजित पवार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत मोठं विधान केले आहे. ते म्हणाले, लाडक्या बहिणीला आपण १५०० रुपये देतोय, परंतू राज्याची आर्थिक परिस्थिती काळानुरूप सुधारेल तेव्हा लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना २१०० रूपये देण्याचा विचार करू, असं म्हणत अजित पवार यांनी लाडक्या बहिणींना पुन्हा एकदा आश्वस्त केल्याचे पाहायला मिळाले.

## झोमॅटोने ६00 कर्मचाऱ्यांची केली हकालपट्टी!

मुंबई : कंपनीचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तसेच खर्च कपात करण्यासाठी अनेक कंपन्या कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करतात. अशातच बदलत्या तंत्रज्ञानानुसार याचा फटकाही अनेकांना पडत आहे. एआयचे आगमन झाल्यापासून प्रत्येक गोष्ट करणे सहजरित्या सोपे झाले आहे. याचाच फायदा आता अन्न आणि किराणा मालाची डिलिव्हरी करणारी कंपनी झोमॅटो देखील घेणार आहे. परंतु यामुळे कंपनीने नोकरीकपात जाहीर केली आहे.

झोमॅटो खर्चात कपात करत असल्याने कंपनीने कर्मचारी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. झोमॅटोने ६०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. अन्न वितरण व्यवसायाची वाढ कमी होत असताना झोमॅटोने हा निर्णय घेतला आहे. तथापी झोमॅटोने या कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यामागील कारणही सांगितले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, झोमॅटोने गेल्या वर्षी न--झ कार्यक्रम सुरू केला, ज्यामध्ये १५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना सामील करण्यात आले आणि त्यांना एका वर्षात विक्री, ऑपरेशन्स, प्रोग्राम मॅनेजमेंट, पुरवठा साखळी आणि श्रेणी संघांमध्ये पदोन्नती देण्यात आली. बहुतेक कंत्राटी कामगारांचे करार संपल्यानंतर कंपनीने त्यांचे नूतनीकरण केले नाही, ज्यामुळे शेकडो कर्मचारी त्यांच्या नोकऱ्या गमावतील, अशी माहिती समोर आली.

दरम्यान, झोमॅटोच्या कर्मचारी कपातीसंदर्भात झोमॅटोच्या एका कर्मचाऱ्याने 'त्याला कोणतीही पूर्वसूचना न देता नोकरीवरून काढून टाकण्यात आले'. नंतर कंपनीने त्याला कारण अयोग्य असल्याचे सांगितले. त्यांनी लिहिले की, 'आज मला झोमॅटोमधून काढून टाकण्यात आले आहे. गेल्या ३ महिन्यांत मी सरासरी २८ मिनिटे उशीरा काम केले होते म्हणून मला काढून टाकण्यात आले.' त्या व्यक्तीने सांगितले की नोकरीवरून काढून टाकण्यात आलेला तो एकटाच नव्हता - झोमॅटोच्या इतर किमान ३०० कर्मचाऱ्यांनाही नोकरी गमवावी लागली आहे.

कर्मचाऱ्यांची झोमॅटोवर टीका

झोमॅटोने केलेल्या कपातीवर अनेक कर्मचाऱ्यांकडून कंपनीवर टीका केल्या जात आहेत. कंपनीने कोणत्याही सूचना किंवा अभिप्रायाशिवाय कर्मचाऱ्यांना काढून टाकले आणि उच्च कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही काढून टाकले, असेही या कर्मचाऱ्याने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. झोमॅटोच्या ग्राहक सेवा स्वयंचलित करण्याच्या प्रयत्नांमुळे या पदांवरील कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत असल्याचा कर्मचाऱ्यांचा आरोप आहे.

याशिवाय, दुसऱ्या एका कर्मचाऱ्याने म्हटले की, 'झोमॅटोने आम्हाला करिअर वाढ - पदोन्नती, पगारवाढ, स्थिरता यांचे आश्वासन दिले. आम्ही खूप तास काम केले, कठोर परिश्रम केले, कंपनीवर विश्वास ठेवला. मग अचानक, त्यांनी आमच्यापैकी ५०० हून अधिक लोकांना काढून टाकले. कोणतीही चेतावणी दिली नाही. कोणतीही जबाबदारी नाही.

# लालू प्रसाद यादव यांची प्रकृती खालावली!



बिहार: : राष्ट्रीय जनता दल प्रमुख आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांची प्रकृती खालावली आहे. त्यांना आज (दि २) एअर एम्बुलन्सने उपचारासाठी दिल्लीला नेण्यात आले.

लालूंच्या रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांना जुन्या जखमांचा त्रास उमाळून आला होता. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना दिल्लीला हलवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. गेल्या काही वर्षांत लालू प्रसाद यादव यांच्यावर ३ मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत. त्यांच्यावर १३ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईतील एशियन हार्ट हॉस्पिटलमध्ये अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्यांच्या छातीत स्टेंट बसवण्यात आला आहे. यापूर्वी २०२२२ मध्ये त्यांचे सिंगापूरमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण झाले होते. त्यांना मुलगी रोहिणी हिने किडनी दान केली होती. त्याच वर्षी, त्यांच्या पत्नी राबडी देवी यांच्या घरी ते अपघाताने पडले, ज्यामुळे त्यांच्या शरीरात अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले. त्यानंतर, त्यांच्यावर पाटण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. प्रकृती अधिक बिघडल्याने, त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात हलवण्यात आले.

तर २०१४ मध्ये लालूंवर ओपन हार्ट सर्जरी झाली होती. गेल्या काही दिवसांपासून लालू प्रसाद यादव अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतानाही दिसले. मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतर, अनेक बाबतीत खबरदारी घ्यावी लागते. किडनीच्या आजाराव्यतिरिक्त, लालू इतर अनेक आजारांनी देखील ग्रस्त आहेत.

## काका फक्त आशीर्वादापुरतेच मर्यादित; देवेंद्र फडणवीस

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीसांनी अजित पवारांच्या वक्तव्याचा संदर्भ घेत, शरद पवारांना चिमटा काढला.

अजित पवारांनी काकांच्या आशीर्वादाने आमचं सगळं चांगलं चाललंय, असं वक्तव्य केलं होतं. यावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मोठ्यांचे आशीर्वाद घेतलेच पाहिजेत. पण लक्षात ठेवा, अजित पवारांनी काकांना फक्त आशीर्वादापुरतेच मर्यादित ठेवलं आहे!

# हिंद महासागरात नौदलाची धडक कारवाई, २५०० किलो अमली पदार्थांची जप्ती



नवी दिल्ली : भारतीय नौदलाने ३१ मार्च २०२५ रोजी हिंद महासागरात धडक कारवाई केली. आयएनएस तर्कश या युद्धनौकेच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. या कारवाईद्वारे २५०० किलो अमली पदार्थांची जप्ती करण्यात आली.

हिंद महासागरात संशयास्पद हालचाली सुरू आहेत, अशी माहिती मिळाली. या माहितीआधारे आयएनएस तर्कश या युद्धनौकेने एका जहाजाला अडवून तपासणी केली. आयएनएस तर्कश या युद्धनौकेवरील नौसैनिकांनी संशयास्पद जहाजाची तपासणी केली. तपासणी करुन २५०० किलो अमली पदार्थांची जप्ती करण्यात आली. या प्रकरणी तपास सुरू आहे.

भारतीय नौदलाने माहिती मिळताच झ८ख या समुद्रात दूरवर गस्त घालू शकणाऱ्या विमानाद्वारे हालचालींवर लक्ष ठेवायला सुरुवात केली. एका जहाजाच्या हालचाली संशयास्पद असल्याचे लक्षात आल्यानंतर त्या जहाजावर हेलिकॉप्टरद्वारे नौदलाचे कमांडो पथक पाठवण्यात आले. या पथकाने हेलिकॉप्टरमधून रश्शी टाकून थेट संशयास्पद जहाजावर वेगाने उतरत कारवाई केली. तपासणी केल्यावर जहाजावर २५०० किलो अमली पदार्थ सापडले. हवाबंद पाकिटांमध्ये हे अमली पदार्थ ठेवले होते. या संदर्भात चौकशी केल्यावर जहाजावर कोणालाही समाधानकारक उत्तर देता आले नाही. यानंतर वेगाने कारवाई करुन जप्ती करण्यात आली. तसेच जहाज नौदलाच्या नियंत्रणात ठेवून जवळच्या बंदरावर आणण्यात आले. जप्त केलेल्या मालात २३८६ किलो हशीश आणि १२१ किलो हेरॉईन आहे. हिंद महासागराच्या पश्चिमेकडील भागात कारवाई करण्यात आली आहे.

## पूनम गुप्ता आरबीआयच्या डेप्युटी गव्हर्नर

नवी दिल्ली, ०२ एप्रिल : नॅशनल काउंसिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या (एनसीईआर) महासंचालक पुनम गुप्ता यांची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) उपगव्हर्नर पदावर नियुक्ती केली आहे. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने पुनम गुप्ता यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली असून, त्या आपल्या कार्यभार स्वीकारण्याच्या तारखेपासून ३ वर्षांसाठी ही जबाबदारी सांभाळतील. उपगव्हर्नर एम. डी. पात्रा यांनी जानेवारीमध्ये राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते.

पूनम गुप्ता सध्या देशातील सर्वात मोठ्या आर्थिक धोरण संशोधन संस्था एनसीईएआरच्या महासंचालक आहेत. त्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्य आहेत तसेच १६ व्या वित्त आयोगाच्या सल्लागार समितीच्या संयोजक म्हणूनही कार्यरत आहेत. एनसीईआरमध्ये प्रवेश करण्यापूर्वी जवळपास दोन दशके त्या वॉशिंग्टन डिसी. येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेत वरिष्ठ पदांवर कार्यरत होत्या. पूनम गुप्ता यांनी मेरीलँड विद्यापीठ (यूएसए) येथून अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी व पीएच.डी. प्राप्त केली असून, दिल्ली विद्यापीठाच्या दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथूनही अर्थशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे.दरम्यान, १९९८ मध्ये त्यांना आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रातील पीएच.डी. संशोधनासाठी एक्झिम बँक पुरस्कार मिळाला होता. गुप्ता यांनी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, मेरीलँड विद्यापीठात अध्यापन केले आहे. तसेच दिल्लीतील भारतीय सांख्यिकी संस्था (आयएसआय), येथेही अतिथी प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

## प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा रिझर्व्ह बँकेच्या प्रगतिशील धोरणाचे सहकार भारतीकडून स्वागत

### नागरी सहकारी बँकिंगचे सशक्तीकरण करणारे उपयुक्त धोरण, प्रायॉरिटी क्षेत्राला कर्ज देण्याने सबलीकरणाला चालना

दि. ०२ एप्रिल :- भारतीय रिझर्व्ह बँकेने प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याच्या धोरणात केलेल्या प्रगतिशील बदलांचे *सहकार भारती* ने स्वागत केले आहे. रिझर्व्ह बँकेचे हे धोरण नागरी सहकारी बँकांना मोठा दिलासा देणारे आहे. या धोरणान्वये प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा (प्रायॉरिटी सेक्टर लेंडिंग अर्थात पीएसएल) करण्याची मर्यादा ७५ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँका अधिक सक्षम होणार असून व्यापक आर्थिक सहभागीतासुद्धा वाढणार आहे, असे मत सहकार भारतीने व्यक्त केले आहे.

पीएसएल मर्यादेत घट करून रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना दैनंदिन कामकाजात येणार्या अडचणी लक्षात घेतल्या असून या बँकांना कर्चवितरणात अधिक लवचिक कारभाराचे स्वातंत्र्य दिले आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँकांना प्राधान्य क्षेत्रांना कर्जपुरवठा करण्याबरोबरच स्थायी प्रगतीवरही लक्ष केंद्रित करता येणार आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रनिहाय अंतर्गत अर्हता निकषांमध्येही सुधारणा करण्यात आल्याने प्राधान्य क्षेत्रांतील कर्जवितरणाचे उद्दिष्ट गाठणेही नागरी सहकारी बँकांना सोपे होणार आहे. आपल्या निधीचा अधिक नेमका व प्रभावी उपयोग करणे त्यांना शक्य होणार आहे.

प्राधान्य क्षेत्रातील कर्जवितरण धोरणांतील सुधारणांमध्ये गृहकर्ज धोरणातील सुधारणा महत्वपूर्ण ठरणार आहे. यासाठी आणलेल्या नवीन मार्गदर्शक तत्वामुळे नागरी सहकारी बँकांना गृहकर्ज देण्यावरील निर्बंध कमी होणार आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प, वैयक्तिक गृहकर्ज यात नागरी सहकारी बँकांना आता अधिक पुढाकार घेता येणार आहे. यामुळे शहरी आणि निम-शहरी विकासात वित्तीय भागीदार म्हणूनही या बँकांचा सहभाग वाढणार असल्याचे सहकार भारतीने म्हटले आहे.

दीर्घकाळ प्रतीक्षेत आणि अत्यावश्यक असलेल्या या सुधारणांमुळे आर्थिक विकासात नागरी सहकारी बँकांची भूमिका अधिक महत्त्वाची होणार आहे. रिझर्व्ह बँकेने लागू केलेले हे सुधारित धोरण प्रभावीपणे अमलात आणण्यासाठी सहकार भारती कटिबद्ध आहे. या धोरणाचे लाभार्थी ठरणाऱ्या सर्व घटकांसोबत राहून नागरी सहकारी बँका आणि विशिष्ट समूह यांना उपयोग व्हावा यासाठी पुढाकार घेणे सहकार भारती आपली जबाबदारी मानते.

नागरी सहकारी बँकांची बाजू प्रभावीपणे मांडून एकूणच सहकार क्षेत्र मजबूत व्हावे यासाठी सहकार भारती सतत प्रयत्नशील आहे.

## वक्फ बोर्ड विधेयकावरून विरोधकांचा संसदेत गोंधळ

नवी दिल्ली, ०२ एप्रिल : केंद्र सरकारने आज, बुधवारी वक्फ मालमत्तांच्या प्रशासनात सुधारणेच्या उद्देशाने मांडलेल्या वक्फ बोर्ड (सुधारणा) विधेयक लोकसभेत मांडले. यावरून विरोधक आणि सरकारमध्ये जोरदार सामना रंगला. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि किरेन रिजिजू यांनी विधेयकाचे समर्थन केले, तर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष, खासदार अखिलेश यादव आणि काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी या विधेयकाला तीव्र विरोध दर्शवला. यावेळी काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, अल्पसंख्याकांना बदनाम व अधिकारहिन करण्याचा हा प्रयत्न म्हणजे संविधानावर हल्ला आहे. सरकार धर्मात हस्तक्षेप का करत आहे? संविधान कमकुवत करणे, अल्पसंख्याकांना बदनाम करणे, त्यांचे अधिकार काढून घेणे आणि भारतीय समाजात फूट पाडणे, हाच यामागचा हेतू आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने २०२३ मध्ये संसदीय समितीच्या ४ बैठकांमध्ये या विधेयकाचा उल्लेख केला नव्हता, पण अचानक त्यावर दुरुस्ती सादर केली. भाजप निवडणूक प्रक्रिया कमकुवत करून धार्मिक सलोखा नष्ट करू इच्छित आहे. वक्फ दुरुस्तीच्या नावाखाली अल्पसंख्याकांना टार्गेट करण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. यासोबतच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी देखील सरकारवर जोरदार आरोप केले. तर सरकारच्यावतीने केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, अमित शाह, खा. रवि शंकर प्रसाद यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या बाजूने जोरदार किल्ला लढवला.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग, बी.ए. प्रथम, द्वितीय वर्गातील विद्यार्थ्यांच्या वतीने निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे हिंदी विभाग प्रमुख डॉ. रणजीत जाधव यांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी प्रवेश करीत असताना महाविद्यालयाने सुसज्ज स्पर्धा परीक्षेचे दालन उपलब्ध करून दिले आहे. तीन वर्षात ज्यांनी त्याचा उपयोग करून घेतला आहे त्यांना भविष्यामध्ये फायदा होईल. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये वेगळे स्वतंत्र असे कौशल्य असते. ते आत्मसात करून आपण भविष्यामध्ये उभे राहिले पाहिजे.

कला शाखेतून पदवी घेतलेले अधिकारी मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेले प्रशासनामध्ये आपल्याला बघायला मिळतात. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी गेल्या तीन वर्षांमध्ये उपलब्ध सुविधांचा वापर करून आपल्या व्यक्तिमत्वाला आकार दिला आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे म्हणाले, बाभळगाव महाविद्यालयास खूप मोठी वैभवशाली शिक्षण आणि संस्काराची परंपरा आहे. महाविद्यालयास जे संस्थेने नाव दिले आहे, त्या नावाची उंची वाढेल अशी कामगिरी आपल्याकडून भविष्यकाळात अपेक्षित आहे. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिकेत्तर कर्मचारीमोठ्या संख्येने उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### नागरबाई शेळके यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** येथील श्री देशिकेंद्र विद्यालयाचे पर्यवेक्षक विलास शेळके यांच्या मातोश्री नागरबाई रामचंद्र शेळके यांचे १ एप्रिल, मंगळवारी रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते.
नागरबाई शेळके यांच्या वर न्यु एम.आय.डी.सी. स्मशान भूमी हरंगुळ (बु) ता.जि.लातूर येथे विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, तीन विवाहित मुली,सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### जयक्रांती अध्यापक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** येथील जयक्रांती अध्यापक विद्यालय व महाविद्यालयांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. अध्ययन, अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
यावेळी कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी छात्रध्यापकांशी संवाद साधला. त्यांनी मराठी विषयातील कवितेचे अध्यापन शिक्षकांनी कसे करावे, यावर मार्गदर्शन केले. मोबाईलचा वापर अध्ययन व अध्यापनासाठी विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी व्हावा, असे ते म्हणाले. कोरोना काळात ऑनलाईन पद्धतीने शिकवण्यासाठी प्रथमच मोबाईलचा वापर केला. त्या ऑनलाईन क्लासेसला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, कुलगुरूही जॉईन होत होते. एका तासिकेत ऑनलाईन पद्धतीने लाखोंच्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. असे प्रा. भालेराव यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत घार होते. यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य डॉ. प्रमोद तांदळे, प्राचार्य विक्रम जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मोहन कांबळे यांनी केले. आभार प्रा. शरद पाडे यांनी मानले. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

### शहर व परिसरात विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** कडक उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना मंगळवारी सायंकाळी रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जिल्हयात पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे वातावरणात गारवा पसरला होता. नागरीकांना कडक उन्हाच्या झळा पासून होणारा त्रास कमी झाला. तर पावसाच्या सरीमुळे रब्बी हंगामातील काढणीस आलेली पिके भिजल्याने शेतक-यांच्या पिकांचे मात्र नुकसान झाले.
जिल्हयात सध्या उन्हाचा पारा ३७ अंश सेल्सीअस च्या वर सरकताना दिसून येत आहे. सकाळी ११ वाजल्यापासून उन्हाचे चटके दुपारी ४ वाजेपर्यत चागल्या प्रकारे जाणवू लागले आहेत. हवामान विभागाने रात्री ७.३० च्या नंतर काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसासह वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवली होती. यानुसार लातूर जिल्हयात रात्री ७.३० नंतर विजाच्या कडकडाटासह जोरदार हवेच्या बरोबर पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

### महिलांसाठी मोफत बसप्रवासाकरिता स्मार्ट कार्ड अनिवार्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** लातूर शहर महानगरपालिका, लातूरच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहरामध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानगरपालिका मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी मनपा हद्दीतील राहणा-या महिलांकरीता आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून दि. १२/१२/२०२४ ते ३१/०१/२०२५ पर्यंत शहरातील विविध ठिकाणावरून रजिस्ट्रेशन करून घेण्यात आले होते. त्यानुसार लातूर शहर मनपाच्या हद्दीतील महिलांना स्मार्ट कार्ड वाटप करण्यात आलेले आहे.

# उन्हाच्या चटक्याने नागरिकांची होतेय होरपळ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** चैत्र महिना सुरू झाला असून उन्हाच्या झळा असह्य होत आहेत. यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. दुपारच्यावेळी उन्हाच्या चटक्यांमुळे रस्त्यावरील गर्दी ओसरलेली दिसून येत आहे. वाढत्या उन्हामुळे लातूरकरांची होरपळ होत आहे. दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालल्याने गरीबांचा फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठाला शहरी भागासह ग्रामीण भागातील बाजारात मागणी वाढली आहे. दरम्यान, बुधवारी सायंकाळी लातूर शहर व परिसरात पडलेल्या आवकाळी पावसामुळे रात्री नागरिकांना थोडासा उकाड्यापासून दिलासा मिळाला. मात्र कांही ठिकाणी विज गेल्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागला.

लातूर शहरासह जिल्ह्यात मागील एक महिन्यापासून उन्हाचा चटका चांगलाच वाढताना दिसत आहे. मागील चार दिवसांपूर्वी ढगाळ वातावरणामुळे उन्हाचे प्रमाण कमी झाल्याचे जाणवत होते. मात्र, उकाडा कायम होता. पुन्हा उन्हाचा चटका वाढत आहे. वाढत्या उन्हापासून संरक्षण व्हावे, यासाठी पादचारी व दुचाकीस्वार आपल्या डोक्यावर गमचा, रुमाल अथवा टोपी वापरत आहेत. त्यासाठी लातूर शहरासह शहराबाहेर जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर टोप्या, गमचासह चष्म्यांचे स्टॉल थाटलेले दिसून येत आहेत. उन्हापासून डोळ्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी काळे चष्मे वापरणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे धुळीसह उन्हापासूनही डोळ्यांचे संरक्षण होण्यास मदत होते. आंब्यांचा सीझन येण्यास आणखी अवधी असला तरी परराज्यातून येणारा आंबा लातूरमध्ये दाखल झाला आहे. मोजक्या फळ विक्रेत्यांनी महाग असला तरी लातूरकरांच्या चवीसाठी आंबा मागविला आहे. वर्षात पहिल्यांदाच आलेल्या या आंब्याच्या खरेदीसाठी नागरिक गर्दी करीत आहेत.

### रसाळ फळांना मागणी वाढली

**वाढत्या उन्हापासून शरीराचे संरक्षण व्हावे, यासाठी उन्हाळ्यात मिळणाऱ्या रसाळ फळांची मोठ्या प्रमाणावर बाजारात आवक झाली आहे. त्यांच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होताना दिसत आहे. कलिंगड, खरबूज, टरबूज, चिकू, सफरचंद, पपई, पेरू, मोसंबी, संत्री, डाळींब, संत्रे, द्राक्षे, अननस, फणस, अंजीर अशी रसाळ, थंडावा देणारी फळे विक्रीसाठी बाजारात दाखल झाली आहेत. त्यांच्या खरेदीसाठीही अनेकजण गर्दी करताना दिसत आहेत. यामुळे फळांच्या आवकबरोबर विक्रीही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.**

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बी.कॉम. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, डॉ.ब्रिजमोहन दायमा, डॉ.बाळासाहेब चव्हाण, डॉ.मनिषा अष्टेकर आदींची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालय आणि प्राध्यापक यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. वाणिज्य शाखेतून पदवी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## 'वसुंधरा'ने साजरा केला अनाथ लेकरांसोबत पाडवा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या येथील वसुंधरा प्रतिष्ठानने अनाथ लेकरांसोबत गुढीपाडवा साजरा केला.

शहरातील एमआयडीसी भागातील मुलींचे निरीक्षण गृह (अनाथाश्रम) येथे वसुंधरा प्रतिष्ठानच्यावतीने गुढीपाडवा साजरा करण्यात आला. यावेळी विधिवत पूजा करुन तेथील अनाथ मुलींना मिठाई आणि बताशाचे हार देण्यात आले. अनाथांच्या चेहऱ्यांवर हास्य फुलावे आणि समाज आपल्यासोबत आहे हा संदेश देण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान गेल्या ९ वर्षांपासून येथे दिवाळी आणि पाडवा हे दोन्ही सण उत्साहात साजरा करते. यावेळी येथील मुलींनी रांगोळी काढून त्यावर 'माणुसकीची गुढी' असे लिहण्यात आले.



दिवसेंदिवस माणुसकी हरवत चालली आहे. माणुसकी कायम जिवंत राहावी यासाठी ही माणुसकीची गुढी उभारली जाते, असे यावेळी सांगण्यात आले. अनाथ मुलांसोबत वाढदिवस, सण आणि उत्सव प्रतिष्ठानच्यावतीने साजरे केले जातात. शिवाय, त्यांना शैक्षणिक साहित्याचीही मदत करण्यासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी नेहमीच पुढाकार घेतात. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी या अनाथाश्रमात मोठ्या उत्साहात गुढीपाडवा हा सण साजरा करण्यात आला.

## शहरातील धोकादायक डिवायडर कमी करण्यात यावे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** महानगरपालिकेचे उपायुक्त खानसुळे यांना शहरातील डिवायडर कमी करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

लातूर शहराची संख्या जवळपास सात ते आठ लाखांच्या आसपास आहे. त्यामानाने शहरामध्ये टु व्हिलर, फोर व्हिलर व अन्य गाडयांची संख्या जास्त आहे. शहरामध्ये असे काही डिवायडर आहेत ज्यामुळे रोज दिवसभरात चाळीस ते पन्नास अपघात होत आहेत.

तसेच संपूर्ण महिनाभरामध्ये या डिवायडरमुळे दोन ते तीन अपघाती मृत्यू होत आहेत. या सर्व गोष्टीचा रणसम्राट युवक प्रतिष्ठाणने आढावा घेऊन लातूर शहरात किती ठिकाणी अपघाती डिवायडर आहेत हे महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिले या मध्ये ५ नंबर चौक ते निकी हॉटेल, (बार्शी रोड) पर्यंत एक किलो मिटरचा रस्ता आहे.

यामध्ये एकूण ८ डिवायडर आहेत. हे सर्व डिवायडर महापालिकेने कमी करावेत ज्यामध्ये पहिले डिवायडर कोंबडे पेट्रोल पंपसमोरील डिवायडर ५ नंबर चौक, बार्शी रोड लातूर दुसरे डिवायडर पोलीस अधिक्षक निवासस्थान बार्शी रोड, तिसरे डिवायडर नवीन जिल्हाधिकारी कार्यालय समोरील रस्ता (बार्शी रोड) चौथे डिवायडर गायत्री हॉस्पीटलकडे जाणारा रस्ता (बार्शी रोड), पाचवे डिवायडर ऑफिस क्लबकडे जाणारा रस्ता, सहावे डिवायडर महिला पॉलिटेक्नीक कॉलेज (बार्शी रोड), सातवे डिवायडर निकी हॉटेल, (बार्शी रोड) सदरील सर्व डिवायडर (रस्ता दुभाजक) धोक्याचे असून तात्काळ बंद करावेत व होणारे अपघात थांबवावेत या पध्दतीचे निवेदन लातूर महानगर पालिकेचे उपायुक्त खानसुळे सर यांना देण्यात आले.

या प्रसंगी रणसम्राट युवक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रविण बामणकर, राचप्पा वांगी, दयानंद कलशेट्टी, अजय शिराळ, जयद्रथ शिंदे, विशाल भंडगे, गायकवाड मोहन, जिल्हा उपाध्यक्ष ओमकार भडंगे, डुमने श्रीनिवास, ऋषिकेश सुर्यवंशी, अभिषेक गायकवाड, अनिकेत भालेराव, संकेत बामणकर, अमित काळे, शेख सोहेल, निलेश राऊत, ज्योतीराम सावंत, ओमकार पाटील, धनंजय गिराम, अनिल धनेराव, दत्ता पोलकर, विकास हराळे आदी उपस्थित होते.

## तरुणांनी श्रमांची उपासना करावी : सय्यद अब्दुल रहेमान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** श्रम हीच देवता असून तरुणांनी श्रमांची उपासना करून नवे वर्क कल्चर निर्माण करावे असे प्रतिपादन माजी सहाय्यक पोलीस निरीक्षक सय्यद अब्दुल रहेमान यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिरातील बौद्धिक व्याख्यानात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोहर चपळे हे होते तर विचारपीठावर डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ.शिवप्रसाद डोंगरे आणि प्रा. किसनाथ कुडके यांची उपस्थिती होती.

या शिबिराला प्राचार्य प्रो.डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी आणि आम्ही सेवकचे संस्थापक प्रा.रवी बापटले यांचे मार्गदर्शन लाभले. पुढे बोलताना सय्यद रहेमान म्हणाले की, तरुणांनी स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवायला हवा, चांगला विचार आणि व्यवहार अंगीकारला हवा. निर्व्यसनी राहून ग्रंथांच्या व्यासंगातून स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करायला हवे असे ते शेवटी म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सेवालयाच्यावतीने रहेमान यांचे स्वागत करण्यात आले.

# निसर्गाने दिलेले पाणी घ्यायला मनपाची झोळीच दुबळी; जैन संघटनेच्या चर्चासत्रातील सूर

## लातूरला उजनीची गरजच नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ एप्रिल -** निसर्गाने भरभरून पाणी देऊन सुद्धा लातूर शहर महानगरपालिकेच्या गलथान आणि नादान वितरण व्यवस्थेमुळे लातूरकरांच्या नशिबी पाण्यासाठीचे दुर्दैवी दशावतार लादले गेले आहेत.

भारतीय जैन संघटनेच्या लातूर शाखेने जलदिनाचे औचित्य साधून आयोजिलेल्या चर्चासत्रात हा सूर निघाला आणि एक नवाच मुद्दा समोर आला. लातूर शहर पाणीपुरवठ्यासाठी गेली सलग ९ वर्षे मांजरा धरण पुरेसे भरत असूनही, तेथील पाणी लातूर शहराला देण्याच्या अनुषंगाने लातूर महानगरपालिका ,केवळ वितरणातील गोंधळामुळे, अपयशी ठरली आहे. लातूर शहराचा भौगोलिक विचार करता, लातूरमध्ये साधारणतः ७०० ते ८०० मि.मी. पाऊस दरवर्षी पडत असतो. सन २०११ च्या जनगणनेनुसार, लातूरची आजची लोकसंख्या साधारणपणे सव्वा पाच लाखांच्या दरम्यान आहे. या शहरासाठी लागणारा पाणीपुरवठ्याचा शाश्वत स्त्रोत म्हणून केज तालुक्यातील मांजरा प्रकल्प आहे. सन १९९५ मध्ये युती शासनाने या शहराच्या पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने एक संकल्पन केले होते. त्यानुसार लातूर शहरास २९.७० दलघमी पाणी प्रतिवर्ष लागते व त्याचे आरक्षणही मांजरा प्रकल्पातून मंजूर केलेले होते. या आरक्षणा नुसार सध्याचा महत्तम पाणी वापर २० ते २१ दलघमी एवढा आहे.



सन २०२४ मध्ये लातूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी २०५७ पर्यंतचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार २०४७ मध्ये लातूर शहराला साधारणपणे ५६ दलघमी व २०५७ मध्ये ६३ दलघमी पाणी लागेल ,असा अंदाज आहे. सद्यस्थितीत मांजरा धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असूनही लातूर शहर महानगरपालिका आरक्षित केलेल्या पाणीसाठ्याचा पुरेपूर वापर करण्यामध्ये अपयशी ठरत आहे.


या चर्चासत्रात सहभागी झालेल्या तज्ज्ञ जलअभ्यासकांच्या मते, मांजरा धरणाच्या जुलै २०२४ नंतरच्या पाणी वापराचा हिशोब विचारात घेतला तर बिगर सिंचन पाणीपुरवठ्यासाठी १९ दलघमी पाणी वापरात आलेले आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, मांजरा प्रकल्पामध्ये बिगर सिंचन पाणीपुरवठ्यासाठी असलेल्या आरक्षणाच्या अनुषंगाने पुरेसे पाणी उपलब्ध असूनही, त्याचा वापर मात्र होत नाही, असे निदर्शनास येते. या सर्व प्रकारास जबाबदार कोण, असा सवाल आता निर्माण झाला आहे. लातूर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यात राजकीय इच्छाशक्तीही कमी पडते आहे काय, यावरही विचार मंथन यावेळी झाले.

लातूर शहर पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने भारतीय जैन संघटनेच्या लातूर शाखेने या क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तींचे एक चर्चासत्र नुकतेच आयोजित केले होते. त्यामध्ये मराठवाडा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव नरहरे, पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त उपअभियंता महेंद्र जोशी, जीवन प्राधिकरणाचे अभियंता राजेश्वर पाटील, भारतीय जैन संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सीए सुनील कोचेटा, अभय शहा, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, योगगुरु दीपक गटागट, अनिलभाई शहा, संतोष उमाटे आदींनी सहभाग घेतला.

**लातूर शहर पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने शासनाने २००५ मध्ये एक समिती गठीत केली होती. या समितीमध्ये सहभागी असलेले महेंद्र जोशी यांनी या चर्चासत्रात याबाबतची परिस्थिती विशद करून असे सांगितले की,२०४७ पर्यंत लातूर शहरासाठी लागणारे पाणी मांजरा प्रकल्पातूनच अतिशय सहजपणे उपलब्ध होऊ शकते त्याकरिता महाराष्ट्र शासनाने मांजरा नदीवर लातूर शहराच्या पश्चिमेला बांधलेले सहा बंधारे लातूर शहराची पावसाळ्यातील पाण्याची गरज सहजपणे भागवू शकतात. त्यामुळे मांजरा धरणावर पडणारा ताणही कमी होऊ शकतो. या सहा बंधाऱ्यांच्या माध्यमातून पावसाळ्यात साधारणतः ५० दलघमी पाणी कर्नाटकात वाहून जाते.**

**हे पाणी त्या त्या बंधाऱ्यातून उचलून घेणे व लातूर शहर पाणीपुरवठ्यासाठी वापरणे असा विचार महानगरपालिकेने केला, तर लातूर शहराला दररोज पाणीपुरवठा होऊ शकतो आणि त्यासाठी लागणारा खर्चही तसा नगण्य आहे.लातूर शहराच्या वाढत्या गरजेच्या अनुषंगाने दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्यासारख्या दृष्ट्या नेतृत्वाने स्थापन केलेल्या समितीने सुचविल्यानुसार लातूर शहर पाणीपुरवठ्यासाठी मांजरा नदीवर बंधारे बांधण्यात आले. तथापि,त्यांचा वापर केवळ शेती करिताच होत आहे व लातूर शहर हक्काच्या पाण्यापासून वंचित राहत आहे, असाही या चर्चेचा एक सूर होता.**

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७८) सृजनात्मक

गुरुजी म्हणतात झाडावरचे फळ तोडल्याने झाडाला हानी होत नाही; तर झाडाला लाभ होतो. परंतु या भूमीतून अधिक फसल निर्माण करण्याच्या लोभाने, आम्ही भिन्न रासायनिक खतांचा वापर केला, तर कदाचित काही दिवस- काही वेळा खूप पीक मिळेलही. पण कालांतराने जमिनीची उत्पादन क्षमताच कमी होईल. आज अमेरिकेत किंवा विदेशात लाखो एकर भूमी या अशा प्रयोगामुळे उजाड / बंजर होऊ घातली आहे. ही विनाश लीला समजून घ्या. कारखान्यात मशीनच्या क्षयनिधीची व्यवस्था करणे गरजेचे असते. परंतु प्रकृतीच्या या कारखान्यात स्वतः भगवंतांनी अक्षय विकासाची व्यवस्था केली आहे. परंतु आम्ही प्रकृतीच्या अंधाधुंद उपयोगासाठी आपली शक्ती खर्च करणे बरोबर नाही. भगवंतांनी मनुष्याला केवळ उपभोग- प्रवण प्राणी म्हणून जन्माला घातले नाही. जसे इंजिनाला चालवायला कोळसा हवा, परंतु कोळसा खाण्यासाठी इंजिन बनवले नाही. उलट कमीत कमी इंधनातून अधिकात अधिक शक्ती कशी मिळेल, हा बचत दृष्टिकोन हवा. अशी अर्थव्यवस्था मानवी असेल. ती संहारात्मक न होता सृजनात्मक हवी. सुधारणेमुळे प्रकृतीचे शोषण न होता पोषण झाले पाहिजे. प्रकृतीचे दोहन करणे, तिचे स्तन्य जीवनदायी करणे अशी व्यवस्था हवी.

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ॥ उसंतवाणी ॥

१४६७

पाडवा मेळावा । हिंदुत्वर टीका ।
कुंभमेळा फुका । भरविला ॥१॥

'राज'कीय भाषा । काय यांची निष्ठा ।
भक्तांची ती विष्ठा । दिसे यांना ॥२॥

नाशिक मनपा । आली होती हाती ।
तेंव्हा तिची माती । केली यांनी ॥३॥

नदी प्रदूषण । आत्ता आली जाग ।
काढा जरा माग । शासकीय ॥४॥

मुंबईवरती । कोणाची ती सत्ता ।
कोणा मिळे हप्ता । नियमित ॥५॥

खळ्ळ् खट्याक् ची । करूनिया भाषा ।
विकासाची दिशा । फिरवली ॥६॥

कांत 'राज'कीय । ओळखा हा नग ।
रंगलेला बग । जत्रेतला ॥७॥



श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०१ एप्रिल २०२५

## पूर्णवादी बँकेस ८ कोटी ७६ लाखाचा नफा



छत्रपती संभाजीनगर - पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म., बीड ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य बँक असून बँकेने प्रति वर्षा प्रमाणे आपल्या आर्थिक कामगारीचा आलेख उंचावत ठेवला आहे.२०२४-२५ या आर्थिक वर्षात बँकेला बँकेचे जेष्ठ संचालक मा. डॉक्टर अरुणदादा निरंतर यांच्या मार्गदर्शना खाली व नूतन अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांचे नेतृत्वात रू. ८ कोटी ७६ लक्ष एवढा भरघोस नफा झालेला असून मागील वर्षाच्या तुलनेत १ कोटी २० लाख वाढ झाली आहे. दि. ३१/०३/२०२५ रोजी आर्थिक वर्षाअखेर बँकेच्या एकुण ठेवी रू. ८९७.१८ कोटी एवढ्या असून कर्जे रू. ५३७.४४ कोटीची आहेत.बँकेचा एकत्रित व्यवसाय १४३४.६२ कोटींचा झाला असून एकत्रित व्यवसायात ११० कोटीची वाढ झाली आहे. बँकेचे भागभांडवल रू. २८.४८ कोटी असून बँकेची नेटवर्थ रू. ६३.६७ कोटी एवढी आहे तर बँकेच्या नेट एन.पी. ए.चे प्रमाण केवळ ०.६० % इतके आहे जे की नगण्य असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी यांनी दिली तसेच त्यांनी सांगितले कि, बँकेच्या या यशात बँकेचे सर्व सन्मानीय सभासद, ग्राहक, संचालक व सर्व कर्मचारी वृंदाचे फार मोठे योगदान आहे. बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली तसेच बँकेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ अरुणदादा निरंतर यांचे मार्गदर्शनाने, उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे अध्यक्ष सी. ए. एस.पी. लड्डा व सर्व संचालक यांचे साथीने बँकेने सर्व आघाडींवर प्रगती साधून ग्राहकांचा बँकेवरील विश्वास अभेद्य ठेवून केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २२/०४/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ११३/२०२५

अर्जदार : १. शशिकला भ. अशोक चव्हाण, वयः ६५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चिंचखेडा खु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. समाधान पि. अशोक चव्हाण, वयः ३० वर्षे, धंदाः शेती, रा. चिंचखेडा खु., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. भाग्यश्री भ्र. राजू वाघ, वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. तिनवाडी, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. ४. उज्वला भ्र. केदारनाथ उगले, वयः ४२ वर्षे, धंदाः घरकाम, रा. ममदापुर, ह.मु. नाशिक, ता. जि. नाशिक, ५. कविता भ्र. मनोहर शिंदे, वयः ३४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. नांदगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक. ६. वैशाली भ्र. दिगबर साळुंके, वयः ३३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. नायडोंगरी, ता. नांदगाव, जि. नाशिक. ७. कल्पना भ्र. जगदीश शिरसाठ, वयः ३० वर्षे, धंदाः घरकाम, रा. सवंदगाव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.
अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील नामे अशोक नामदेव चव्हाण हे दि. ०५/०७/२०२४ रोजी मौजे चिंचखेडा खु., ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत अशोक नामदेव चव्हाण यांना अर्जदार क्र. १ ते ७ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठो वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २५/०३/२०२५

आदेशावरुन

क.लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर

## सोयगाव परिसरात अवकाळीने आंब्यांचे मोठे नुकसान

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२ एप्रिल



सोयगाव सह परिसरात मंगळवारी रात्री एक वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्या सह किरकोळ अवकाळी पावसाने हजेरी लावकी होती त्यामुळे बुधवारी पहाटे पासून शेतकऱ्यांची धांदल उडाली होती अवकाळीच्या पाऊस आणि वादळी वाऱ्याने रब्बीची कापणी वर आलेली पिकं व उन्हाळी पिकांची नुकसान झाले आहे.आंबा,उन्हाळी ज्वारी,मका आडव्या झाल्या मुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे सोयगाव सह परिसरात मंगळवारी रात्री अचानक वादळी वारा व किरकोळ अवकाळीच्या हलक्या स्वरूपात सरी कोसळल्या दरम्यान बुधवारीही सोयगाव परिसरात ढगाळ वातावरण होते त्यामुळे रविवार पासून ते बुधवार पर्यंत सलग चार दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे

## दुर्गा इंग्लिश स्कूल व जूनियर कॉलेज येथे बक्षीस वितरण संपन्न



बिडकीन दि २ एप्रिल : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज बिडकीन येथे बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बिडकीन पोलीस उपनिरीक्षक अशोक माने यांची उपस्थिती लाभलेली होती. तसेच शाळेचे सचिव राजेंद्र जैस्वाल व रोशन जैस्वाल यांची देखील उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करुन माता सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. शाळेचे संस्थापक ओमप्रकाश जैस्वाल यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. विविध खेळांमध्ये सहभागी झालेल्या मुलांचे मनोबल वाढवण्यासाठी बक्षीस वितरण हा कार्यक्रम घेण्यात येत असतो. उपस्थित असलेल्या प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांनी मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे प्राचार्य अभिजीत इंगळे व दर्शना कोकणे, सुनीता चव्हाण , दिक्षा साबळे ,जयश्री नजन , ओसीन शिंदे, आरती इंगळे, शिवानी ठाकूर, सीमा वंजारे आदी सर्व शिक्षकांची उपस्थिती होती.

## फारोळा ग्रामपंचायत कार्यालय येथे कन्या दिन उत्साहात



बिडकीन दि.२ एप्रिल : पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा अंतर्गत वयवृद्ध दिव्याग, महिलांसाठी , शालेय विद्यार्थ्यांसाठी, तसेच गावातील नागरिकांसाठी, नेहमीच विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याने फोराळा ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते येथे आज दि २ एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलींचा कन्या दिनानिमित्त कार्यक्रम ग्रामपंचायत येथे आयोजित करण्यात आला होता या कन्या दिनानिमित्त सरपंच सलीम महंमद पठाण ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे यांच्या हस्ते कुमारी मुलीनां पुष्प देऊन स्वागत करण्यात आले व कन्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट ,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,मीरा हाडे,गायत्री तुपे,कांचन बिडकर,मीना पवार,कोमल निकम,मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे, अपर्णा निकुंभ , राजश्री गवळी , वर्षा राणी कमळु , किती सुर्यवंशी, विद्या काकडे , शितल शिरवत , ज्योती जवणे ,सुलभा शेळके , सिताळ सिताळ , गणपत जाधव , अरविंद महाकाळे,पायल गव्हाणे,अक्षरा धरपळे,स्नेहा कांबळे,रुकसार शेख,पुनम शिंदे,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,शिवाजी,अन्नासाहेब धुमाळ, संतोष बारवाल,परमेश्वर कुमावत,संजय लाहोरे,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने गावकरी आदींची उपस्थिती होती.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही.एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : २२१/२०२५
पुढील तारीखः ०३/०५/२०२५

अर्जदार : १-शेख समद शेख अहमद, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २-फरजानाबी अहेमद शेख, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ३-रुकसाना अकील शेख, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर.

- विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर.
अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.डी. जोशी यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक २ चे पती व अर्जदार १ व ३ चे वडील नामे अहमद गुलाब शेख हे दिनांक १०.११.२०२४ रोजी शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय, छ. संभाजीनगर जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद, येथे मयत झालेले आहे, सोबत शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुग्णालय, छ. संभाजीनगर जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद) यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक २६.०३.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २९.०३.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : २९.०३.२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०८/०४/२०२५
दि.कि.अर्ज क्र. १७१/२०२५

अर्जदार : १. चंद्रभागाबाई पांडुरंग वाघ, वयः ७० वर्षे, धंदाः घरकाम, रा. करंजखेड ज., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. संजय पांडुरंग वाघ, वयः ४३ वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेड ज., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. राजु पांडुरंग वाघ, वयः ४० वर्षे, धंदाः शेती, रा. करंजखेड ज., ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. सुनिता पांडुरंग वाघ, वयः ३८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. करंजखेड ज., ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
अर्ज : लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे पांडुरंग बुढाजी वाघ हे दि. १७/०६/२०२४ रोजी मौजे करंजखेड ज., ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत पांडुरंग बुढाजी वाघ यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिल् २५/३/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४८ /२०२५

अर्जदार : १) श्रीमती कमलाबाई युवराज देवरे, २) श्रीमती रेखाबाई राजेंद्र देवरे, ३) श्री. जयकुमार राजेंद्र देवरे, ४) श्रीमती राजश्री रोहित ठाकरे सर्व रा. आज मुक्काम इंदिरानगर, मु.पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११५०.

विरुध्द

सामनेवाले : कोणीही नाही

ज्याअर्थी के, राजेंद्र युवराज देवरे यांचे दि. २५/०१/२०२५ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेगुलशन ॲक्ट १८२७ प्रमाणे ॲड तन्मय सुनिल जैन यांच्या मार्फत अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. राजेंद्र युवराज देवरे यांचे कायदेशीर चारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना बारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी में कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. ९/५/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.
ही जाहिर नोटीस ता.०१/०४/२०२५

लिपिक | अधिक्षक
सि.ज.ज्य.डि.सा., सोयगांव.

### जाहीर प्रगटन

**मा.ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. १०४/२०२५
पु.ता. ९/४/२०२५

अर्जदार : १) राजु गंगाधर काळे, वय- ४७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद २) संजय गंगाधर काळे, वय- ५० वर्ष, धंदा मजुरी, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३) सत्यभामाबाई भ्र. बापु राऊत वय ६० वर्ष, धंदा- घरकाम, रा. शेकटा, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद ४) शंकर गंगाधर काळे (मयत) मयताचे वारस ४-१) अलका भ्र. शंकर काळे वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४-२) मंगेश पि. शंकर काळे, वय- ३४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४-३) विकी पि. शंकर काळे वय ३२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४-४) भाग्यश्री भ्र. मारोती देवकर वय- २६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कारवाडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, ५) लक्ष्मीबाई प्र. गंगाधर काळे वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोरोबा नगर, कन्नड ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. आर. शिंदे यांचे मार्फत वारस प्रमाणत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन असुन अर्जदार क्र. ४ हा त्यांचा भाऊ होता तो मयत झालेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ४-१ ते ४-४ हे वारस आहे, तसेच अर्जदार क्र. ५ ही अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील अर्जदार क्र. ४-१ चे सासरे, अर्जदार ४-२ ते ४-४ यांचे आजोबा, अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे गंगाधर आसाराम काळे हे होते ते दिनांक ०८/१२/२०२४ रोजी मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. ४ हा मयत गंगाधर आसाराम काळे व अर्जदार क्र. ५ यांचा मुलगा होता तो देखील दिनांक ३१/०३/२०२२ रोजी मयत झालेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ४-१ ही पत्नी असुन अर्जदार क्र. ४-२ ते ४-४ हे मुले व मुलगी आहे.

अर्जदार यांना मयत गंगाधर आसाराम काळे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरीलवारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे सदर वारस प्रमाणपत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ५ व ४-१ ते ४-४ हे वारस आहे. यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दार सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.
दिनांक २७/०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ११९/२०२५

अर्जदार : १. विमलबाई धनराज बागुल, वय ५६ वर्षे, धंदा शेती, (पत्नी), २. राहुल धनराज बागुल, वय ३८ वर्षे, धंदा शेती, (मुलगा) ३. अरुणा राजेंद्रभाई सोनवणे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, (मुलगी) ४. करुणा धनराज बागुल, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, (मुलगी) ५. जयदीप धनराज बागुल, वय ३२ वर्षे, धंदा शेती, (मुलगा) वरील र्स रा. उप्पलखेडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.
प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत धनराज फकिरा बागुल हे दि. १४/१०/२०२४ रोजी उप्पलखेडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. वरील सर्व अर्जदार हे मयत धनराज फकिरा बागुल यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०६/०५/२०२५.

आज दि. ०२/०४/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश क. स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि.अर्ज क्र. २९४/२०२५

अर्जदार - १) कडूबाई भ्र. ज्ञानेश्वर जगताप, वय ५८ वर्षे, धंदा निरंक, २) बाबासाहेब पि. ज्ञानेश्वर जगताप, वय ३७ वर्षे, धंदा गृहीणी, वरील दोघे रा. जयसिंगनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर ३) बेबी थोरात वय ४५ वर्षे, धंदा गृहीणी, रा. चिचोंडी, ता. पाथर्डी जि. अहमदनगर ४) नंदा भ्र. गोरक्षनाथ गाडेकर वय ४२ वर्षे, धंदा गृहीणी, रा. लक्ष्मीनगर, नेवासा खुर्द ता. नेवासा जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक
प्रकरण - वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेबाबत..

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विधिज्ञ एम. बी. गुडदे यांचेमार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार नं. १ यांचे पती म्हणजेच अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील ज्ञानेश्वर गणपत जगताप हे दि. ०१/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत, मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांची आई नामे आसराबाई गणपत जगताप व वडील गणपत बाजीराव जगताप हे सुमारे ४० ते ५० वर्षापुर्वी मयत झालेले आहेत, त्यामूळे वरील अर्जदारांशिवाय मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांना कोणीही वारस नाही, अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस आहे. मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांच्या नावे असेलेली मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील नगर परीषद मिळकत क्र. ३४/१ क्षेत्रफळ ४८० चौ. फुट ही मिळकत अर्जदारांच्या नावे करणे कामी तसेच भविष्यात काही अडचण येवू नये म्हणून अर्जदारांना ते मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र हवे आहे. करीता अर्जदारांनी मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी या न्यायालयास केली आहे.

त्याअर्थी वरील अर्जदारांच्या नावे मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत/आक्षेप असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा त्यांच्या विधिज्ञामार्फत हजर होवून आपले आक्षेप/हरकत मांडावे नसता कुणाचीही हरकत/आक्षेप नाही असे समजून वरील अर्जदार हे मयत ज्ञानेश्वर गणपत जगताप यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाप्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए.आय. आवटी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः २०८/२०२५
पुढील तारीख : २/०५/२०२५

अर्जदार : १-स्वाती भ्र. अशोक कुलकर्णी, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. आठेगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ह.मु. रांजनगांव शे.पुं. ता. गंगापुर, जिल्हा औरंगाबाद. २. अंजली पिता अशोक कुलकर्णी, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. आठेगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ह.मु.एन-९, एम-२ हडको, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर.
अर्ज : कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.डी.जोशी यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चे पती नामे अशोक दिगंबर कुलकर्णी हे दिनांक १७.१२.२०२३ रोजी मौजे आठेगांव येथे मयत झाले असून त्यांचा अंत्यसंस्कार देखील मौजे आठेगांव येथे झालेला आहे. मयत अशोक दिगंबर कुलकर्णी यांना वारस अर्जदार क्रमांक १ व २ असून त्यांचा मुलगा नामे अनंता अशोक कुलकर्णी हे दिनांक ६.७.२०२० रोजी मयत झालेले आहेत. मयत अशोक दिगंबर कुलकर्णी यांचे वडील दिगंबर मल्हारराव कुलकर्णी हे दिनांक २७.७.२०१७ रोजी मयत झाले असून अशोक दिगंबर कुलकर्णी यांच्या मातोश्री ते अतिशय लहान असतांनाच मयत झालेल्या आहेत. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक २०.०३.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी व बँकेचे व्यवहार ईत्यादी साठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड व वर उल्लेखीत मयत व्यक्तींचे मृत्युप्रमाण पत्र विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २८.०३.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : २८.०३.२०२५

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# मोबाईल वापरातील वाढीची दुसरी बाजू

भारताने मोबाईल फोन्सच्या उत्पादनात जागतिक आघाडी घेतलेली असताना मोबाईलची देशांतर्गत मागणीही प्रचंड वाढल्याचे वृत्त एकीकडे आनंदाचे आणि दुसरीकडे विचार करण्यासारखेही आहे. काही प्रमाणात ते चिंता जागविणारेदेखील आहे. भारतात २०१४ मध्ये १२ अब्ज डॉलर्सचे मोबाईल फोन्स विकले गेले. दशकभरात प्रतिवर्षी सरासरी १३ टक्के वाढ होऊन २०२४ मध्ये मोबाईल फोन्सच्या विक्रीचा आकडा ३६ अब्ज डॉलर्सवर गेला. याचा अर्थ दशकभरात मोबाईल्सची मागणी तिप्पट वाढली. लोकसंख्या तिप्पट झाली नाही. लोकांची कमाई तिप्पट झाली नाही. पण, मोबाईल फोन्सची मागणी तिप्पट झाली. हा खरे तर संशोधनाचा विषय आहे. सुबत्ता आणि गरजेचा भाग म्हणून एकेक माणूस दोन-तीन फोन वापरतो हे मान्य केले तरी ही वाढ जरा जास्तच वाटते. टेलिकॉलिंग कंपन्या आणि ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्यांनी वापरावयाच्या मोबाईल्सची संख्या वाढवली आहे काय, हेही तपासले पाहिजे.

गेल्या दोन दशकांमध्ये जागतिक मोबाईल फोनची बाजारपेठेत प्रचंड वाढ झाली आहे. २०२४ पर्यंत जगभरातील मोबाईल फोन बाजारपेठ अंदाजे ५५० अब्ज डॉलर्सची होती. विकसित देशांमध्ये स्मार्टफोनचा वापर ८० टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे आणि विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये तो सातत्याने वाढत आहे. या विस्तारात भारताने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा स्मार्टफोन बाजार आहे, जिथे १.२ अब्जापेक्षा जास्त मोबाईल कनेक्शन्स आहेत. भारत दरवर्षी ३० कोटींहून अधिक स्मार्टफोनचे उत्पादन करतो. दरवर्षी जागतिक स्तरावर १.५ अब्जपेक्षा जास्त स्मार्टफोन विकले जातात. चीन हा सर्वांत मोठा स्मार्टफोन उत्पादक देश आहे. त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. ही आकडेवारी मोबाईल फोन उद्योगातील भारताच्या आघाडीचे उदाहरण म्हणून पाहता येते. तसे ते पाहिले जाते आहे. मात्र, यात काही गोष्टी चिंताजनक आहेत, ज्याकडे आताच लक्ष दिले पाहिजे. मोबाईलचे व्यसन आता सर्व वयोगटातील लोकांमध्ये आढळते. लहान मुलांनादेखील मोबाईलवर गुंतवून ठेवण्याची पद्धत आली आहे. एका अभ्यासानुसार, भारतीय लोक त्यांच्या स्मार्टफोनवर दररोज चार तासांपेक्षा अधिक वेळ घालवतात. हा कालावधी फार जास्त आहे. दिवसातील २४ तासांचे वाटप काम, आराम, व्यायाम, मनोरंजन-कौटुंबिक संवाद अशा चार प्रमुख गोष्टींमध्ये होते किंवा व्हायला हवे. २४ तासांपैकी चार तास मोबाईलवर जात असतील तर यातले काही ना काही बाधित होतच असणार. 'इंडियन जर्नल ऑफ सोशल रिसर्च'ने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, जास्त मोबाईल फोन वापरामुळे ६७ टक्के विवाहित जोडप्यांना नातेसंबंधात ताण जाणवतो. गेल्या दशकात भारतात घटस्फोटाचे प्रमाण १५ टक्क्यांनी वाढले आहे आणि त्यातील प्रमुख मुद्दा हा मोबाईलचा अतिवापर हा आहे. मोबाईलमुळे पालक त्यांच्या मुलांसोबत कमी वेळ घालवतात, त्यामुळे कौटुंबिक नाती कमकुवत होतात. एक अभ्यास तर असे सांगतो की, आजकाल ८ ते १८ या वयोगटातील मुले दररोज सरासरी ७ तास मोबाईल स्क्रीनवर घालवतात. यातून शिक्षण, अभ्यास यावर परिणाम होतोच; शिवाय नैराश्य, आक्रमकता असे विकारही जडतात. जास्त मोबाईल वापरामुळे झोपेचे विकार आणि चिंताग्रस्तता यासारख्या मानसिक आरोग्य समस्या विविध वयोगटातील लोकांना जाणवत आहेत. थेट संभाषणांची जागा मोबाईलसारख्या डिजिटल संवादाने घेतल्याने मानवी नातेसंबंधांमध्ये काही प्रश्न उद्भवू लागले आहेत. एका अभ्यासातून असेही दिसून आले आहे की, सोशल मीडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वाढता वापर हा संबंधित लोकांमध्ये एकाकीपणाची भावना निर्माण करीत असून, लोक सतत ऑनलाईन असूनही एकमेकांपासून दूर आहेत. यातला आणखी एक एक चिंताजनक ट्रेंड म्हणजे कुटुंबातील सदस्य शारीरिकरीत्या एकत्र असतानाही भावनिक उपस्थितीचा अभाव असणे. घरातले चार लोक एकत्र बसले आहेत. पण, एकमेकांशी बोलण्याऐवजी मोबाईलशी चाळा करीत आहेत, हे अनेक घरांतले चित्र झाले आहे. त्यावरून घरांमध्ये वाद होतात.

सामाजिक व कौटुंबिक प्रश्नांखेरीज मोबाईल फोन्सच्या अतिवापरामुळे इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची (ई-वेस्ट) समस्याही वाढत असल्याचे दिसून येत आहे. निकामी झाल्यामुळे फेकून दिलेले मोबाईल फोन, बॅटरी आणि ॲक्सेसरीजसह ई-कचरा हा पर्यावरणासाठी एक महत्त्वाचा धोका आहे. जागतिक पातळीवर, दरवर्षी ५० दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक ई-कचरा निर्माण होतो, ज्यामध्ये मोबाईल फोनचा वाटा जवळजवळ ८ टक्के आहे. भारत ई-कचरा निर्मितीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. जागतिक स्तरावरील ई-कचऱ्यापैकी फक्त २० टक्के कचऱ्याचा योग्यरीत्या पुनर्वापर केला जातो; उर्वरित कचरा जमिनीत दाबला, दडपला जातो व त्यामुळे माती आणि पाणी दूषित होते. मोबाईल फोनमध्ये शिसे, पारा आणि कॅडमियम यांसारखे घातक पदार्थ असतात, जे वातावरणात मिसळून प्रदूषण वाढवितात. व्यवस्थित विल्हेवाट न लावल्याने जड धातूंचे दूषितीकरण होते, ज्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत प्रभावित होतात. ई-कचऱ्याचा पुनर्वापर क्षेत्रातील कामगारांना हानिकारक रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे श्वसन आणि मज्जासंस्थेशी संबंधित विकार होतात, असेही संशोधक सांगतात. पर्यावरणीय प्रदूषणाच्या भारात भर म्हणजे वारंवार मोबाईल फोन अपग्रेड करण्याची पद्धत. कंपन्या दरवर्षी नवीन मॉडेल्स जारी करतात. त्यामुळे लाखो उपकरणे विनाकारण वापरातून बाजूला केली जातात. ती खराब होतात. त्यामुळे विषारी ई-कचरा धोकादायक प्रमाणात जमा होतो. विकसनशील देशांमध्ये प्रचलित असलेल्या अनौपचारिक ई-कचरा पुनर्वापर उद्योगात ॲसिड बाथ आणि पार्ट्स उघड्यावर जाळणे यासारख्या असुरक्षित पद्धती वापरल्या जातात आणि त्यामुळे हानिकारक प्रदूषक हवेत आणि जलसाठ्यात सोडले जातात. या संकटांचा सामना करण्यासाठी ई-कचरा संकलन आणि पुनर्वापर प्रक्रियेचे मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. मोबाईल फोन उत्पादन, वापर व विल्हेवाटीच्या प्रक्रियेत वर्तुळाकार अर्थव्यवस्थेच्या (सर्क्युलर इकॉनॉमी) मॉडेल्सना प्रोत्साहन देणे आणि ग्राहकांना शाश्वत विल्हेवाट पद्धतींबद्दल शिक्षित करणे आवश्यक आहे. हे सारे लक्षात घेतले तर भारताची मोबाईल फोन उत्पादनातील व वापरातील प्रगती उल्लेखनीय असली, तरी त्यातील काही घटक चिंता वाटावे असे आहेत, हे आपण मान्य केले पाहिजे. शाश्वत विकास हा आता जगभर वापरला जाणारा परवलीचा शब्द आहे; ज्यातून पर्यावरणाची हानी कमीत कमी होते किंवा होत नाही, असा विकास म्हणजे शाश्वत विकास किंवा सस्टेनेबल डेव्हलपमेंट. वर्तमानाच्या गरजा भागविताना भविष्यातील पिढ्यांच्याही काही गरजा असतील याबद्दल कटाक्ष ठेवणे हे सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे प्रमुख लक्षण होय. मोबाईल फोन्स सर्वांना वापरावे लागतील, यात वाद नाही. त्याला पर्यायही नाही. मात्र, त्यांचा एवढा अतिवापर होऊ नये की भविष्यातील पिढ्यांचे व्यसनाधीनता, ई-वेस्ट, सामाजिक व कौटुंबिक ताणतणावाच्या माध्यमातून नुकसान होऊ नये. शाश्वत विकासासाठी तांत्रिक प्रगतीची सांगड संसाधनांच्या जबाबदार वापराशी घालावी लागते. त्यात समतोल साधायचा असतो. डिजिटल वेलनेसला प्रोत्साहन देऊन, मानवी संबंध मजबूत करून आणि प्रभावी ई-कचरा व्यवस्थापन धोरणे राबवून तसेच सामाजिक आणि पर्यावरणीय व्यवस्थेशी तडजोड न करता मोबाईल तंत्रज्ञानाचे फायदे आपण वापरू शकलो तर मानवजात खऱ्या अर्थाने बुद्धिमान ठरेल. विकासाच्या मागे धावताना आंधळेपणा कामाचा नाही. जागतिक पातळीवर मोबाईलच्या उत्पादनात आणि वापरात भारताची आघाडी हा प्रत्येक भारतीयाच्या आनंदाचा विषय आहेच. पण, त्यातून आपण काही गमावणार नाही ना, याची शंका आपल्याला सतत येत राहिली पाहिजे. तशी ती आली तर आपण सजग आहोत, असे म्हणता येईल. आकड्यांमध्ये दिसणाऱ्या प्रत्येक वाढीमागे जसे वृद्धीचे अर्थकारण असते, तसे त्यामागे कुठल्या तरी घटीचेही संकेत असतात, हे समजून घेणे आवश्यक आहे. मोबाईल फोनच्या उत्पादनातील व वापरातील वाढ याला अपवाद नसावी.

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# शस्त्रास्त्रनिर्मितीमध्ये आत्मनिर्भरतेच्या वाटेवर

देश आज एका नव्या वाटेवर चालत आहे. देशाच्या सैन्याला बळकट करण्यासाठी बाहेरून शस्त्रास्त्रे खरेदी करण्याऐवजी देशातच शस्त्रास्त्रे तयार करण्याचा प्रयत्न होत आहे. भारतीय लष्कर शक्तिशाली व्हावे, देशाचा पैसा वाचावा आणि आपण स्वयंपूर्ण व्हावे, अशी सरकारची इच्छा आहे; पण हा मार्ग सोपा नाही. भारताभोवतीचे वातावरण नेहमीच अशांत असते. कधी शेजारी देशांशी तणाव वाढतो, तर कधी संकट येते. अशा परिस्थितीत बाहेरून शस्त्रास्त्र घेणे लगेच बंद करता येणार नाहीत; परंतु भारताला स्वतःची शस्त्रे बनवावी लागतील. सैन्य कायम शस्त्रसज्ज असेल, अशी व्यवस्था करावी लागत असल्याने इतर कोणत्याही देशाच्या मदतीची गरज भासणार नाही, अशी व्यवस्था आपल्याला निर्माण करावी लागेल. स्वतःच शस्त्रे निर्मिल्याने देशात काम वाढेल. तरुणांना कारखान्यांमध्ये रोजगार मिळेल. लहान-मोठे उद्योग प्रगती करतील. भारत आता आपली शस्त्रे विकत आहे. यातून पैसा येईल आणि भारताची ताकद जगाला दिसेल. नवीन शोध लागतील. लष्करासाठी नवीन तंत्रज्ञान तयार केले जाईल. गावे आणि लहान शहरांमध्येही कारखाने सुरू होतील. तेथील लोकांचीही प्रगती होईल. अर्थात आज हे स्वप्न राहिलेले नाही, तर देशाने या दिशेने मोठी झेप घेतली आहे. यापूर्वी संरक्षण वस्तूंचे उत्पादन ४६,४२९ कोटी रुपये होते. आता ते दुप्पट झाले आहे. शस्त्रास्त्रांची निर्यातही गगनाला भिडत आहे. २०१४ मध्ये शस्त्रास्त्रांची निर्यात केवळ ६८६ कोटी रुपयांची होती. २०२४ मध्ये ती २१,०८३ कोटी रुपयांवर पोहोचली. म्हणजे ३० पट वाढ!

भारत आता तेजस विमाने, आकाश क्षेपणास्त्रे आणि वेगवान नौका बनवत आहे. आता ६५ टक्के संरक्षण उत्पादने भारतात बनतात. पूर्वी ती बहुतेक आयात केली जायची. १६,००० हून अधिक लहान कंपन्या आणि ४३० मोठ्या कंपन्या या कामात गुंतल्या आहेत. सरकारने बनवण्यायोग्य ५,५०० वस्तूंची यादी तयार केली. त्या आता बाहेरून आयात केल्या जाणार नाहीत. यापैकी तीन हजार वस्तू भारतात बनवल्या जाऊ लागल्या आहेत. उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण क्षेत्रे तयार करण्यात आली आहेत. येथे ८,६५८ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून, ५३ हजार ४३९ कोटी रुपयांचे सौदे झाले आहेत. भारतात 'आयडेक्स' नावाचा कार्यक्रम सुरू आहे. यामध्ये ६१९ स्टार्टअप्सना ४४९.६२ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. असे असले, तरी सर्व काही चांगले आहे, असे नाही. त्यात काही अडचणीही आहेत. भारताला मोठ्या शस्त्रास्त्रांचे तंत्रज्ञान माहीत नाही. उदाहरणार्थ, लढाऊ विमानाचे इंजिन किंवा विशेष इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान. त्यासाठी अजूनही परदेशी मदतीची गरज आहे. खाजगी कंपन्याही या बाबतीत कमी काम करत आहेत. त्यांचा वाटा फक्त २१ टक्के आहे. उर्वरित काम सरकारी कंपन्या करतात. कच्चा माल खरेदीला बराच विलंब होतो. अजूनही निर्णय लवकर घेतले जात नाहीत. यामुळे लष्कराला नवीन उपकरणे मिळण्यास वेळ लागतो. संशोधनावरही कमी पैसा खर्च होतो. शास्त्रज्ञ नवीन गोष्टी तयार करतात; पण त्या मोठ्या प्रमाणावर बनवल्या जात नाहीत. भारत अजूनही पाणबुड्या, लढाऊ जहाजे आणि ड्रोन बाहेरून खरेदी करतो.

भारत हा शस्त्रास्त्र खरेदी करणारा जगातील सर्वांत मोठा देश असल्याचे एका अहवालात म्हटले आहे. बहुतेक संरक्षण सामुग्री रशियातून येते. संरक्षणमंत्र्यांनी आत्मनिर्भरता आणि प्रगत उपायांवर भर दिला. संरक्षण क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक ४९ टक्क्यांवरून ७४ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत ५०० हून अधिक शस्त्रे आणि यंत्रणांच्या आयातीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी देश वेगाने पुढे जात आहे. यामध्ये लष्कराची लढाऊ वाहने, जहाजावर आधारित मानवरहित हवाई यंत्रणा, मध्यम-श्रेणीची अचूक स्ट्राईक यंत्रणा, सागरी पाळत ठेवणारी विमाने, युद्धनौका, हेलिकॉप्टर, टाक्या, तोफखाना, क्षेपणास्त्रे, हलकी वाहतूक विमाने, लांब पल्ल्याची क्रूझ क्षेपणास्त्रे, ट्रेनर विमाने यांचा समावेश आहे. आजचे शत्रू पारंपरिक शस्त्रे घेऊन हल्ला करत नाहीत. सायबर हल्ले, चुकीच्या माहितीच्या मोहिमा आणि स्पेसआधारित हेरगिरी हे नवीन युगाचे धोके म्हणून उदयास येत आहेत. यासाठी प्रगत उपाय आवश्यक आहेत. आधुनिक जगात सुरक्षाविषयक नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेतील गरजा वाढत आहेत. आपल्या संस्थांनी या गोष्टी समजून घेणे आणि सशक्त, सुरक्षित आणि स्वावलंबी भारत घडवण्यासाठी सहकार्याने कार्य करणे अत्यावश्यक आहे.

भारताने संरक्षणसामग्रीच्या क्षेत्रात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. यामध्ये विविध प्रकारची शस्त्रे, यंत्रणा, दारूगोळा, गंभीर उपप्रणाली आणि इतर गोष्टींवर टप्प्याटप्प्याने आयातबंदी लादण्यात आली आहे. तसेच, देशात उत्पादित लष्करी हार्डवेअर खरेदी करण्यासाठी स्वतंत्र बजेट तयार करावे लागेल. एक काळ असा होता, जेव्हा भारत शस्त्रास्त्रांसाठी जगातील देशांवर अवलंबून होता; पण आता काळ बदलला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेअंतर्गत जगातील अनेक देशांना शस्त्रे पुरवली आहेत. भारतीय शस्त्रे जवळपास ८५ देशांमध्ये पोहोचली आहेत. गेल्या काही वर्षांचा आढावा घेतल्यास भारताच्या संरक्षण निर्यातीत झपाट्याने वाढ झाली आहे. भारताने जगातील अनेक देशांना क्षेपणास्त्रे, तोफखाना, रॉकेट, आर्म्ड वाहने, वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे, रडार, पाळत ठेवणारी यंत्रणा आणि इतर शस्त्रे पुरवली आहेत. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ३४ देशांनी भारताकडून बुलेटप्रूफ जॅकेट्स खरेदी केली असून त्यात ऑस्ट्रेलिया, जपान, इस्रायल आणि ब्राझील यांचा समावेश आहे. सुमारे दहा देशांनी भारताकडून दारूगोळा खरेदी केला आहे. अमेरिका, ब्रिटनसारख्या देशांनीही शस्त्रे खरेदी केली आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्ससारख्या महासत्तांनी भारताकडून संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स वस्तू खरेदी केल्या आहेत. भारताने मॉरिशस, सेशेल्स आणि मालदीवमध्ये वेगवान इंटरसेप्टर बोटींची निर्यात केली आहे.गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड'ने तेजस मल्टीरोल फायटर जेट खरेदी करण्यासाठी तीन देशांशी चर्चा सुरू असल्याचे सांगितले होते. नायजेरियाशी चर्चा प्राथमिक टप्प्यात आहे. तसेच अर्जेंटिनाला १५ तेजस लढाऊ विमाने आणि इजिप्तला वीस लढाऊ विमाने विकण्याची चर्चा सुरू आहे. भारताने व्हिएतनाम आणि फिलिपाईन्सला आकाश क्षेपणास्त्रे विकण्याची ऑफर दिली आहे तर इजिप्तनेही त्यात रस दाखवला आहे. असे असले, तरी या शस्त्रास्त्रनिर्मिती आणि निर्यातीला अधिक चालना देण्यासाठी शास्त्रज्ञ, खाजगी कंपन्या आणि स्टार्टअप यांना एकत्र आणावे लागेल. 'एआय', वेगवान क्षेपणास्त्रे आणि छुप्या शस्त्रांवर काम करावे लागणार आहे. खाजगी कंपन्यांना अधिक संधी द्याव्या लागतील. त्यांच्यासाठी नियम सोपे करावे लागतील. शस्त्रास्त्रांच्या चाचणीसाठी नवी ठिकाणे निर्माण करावी लागतील. यासाठी खाजगी कंपन्या मदत करू शकतात. तंत्रज्ञान आणि उत्पादनात भारताने इतर देशांशी भागीदारी केली पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे, ज्यामध्ये स्वावलंबनाच्या दिशेने प्रगती दिसून येईल. भारताचे आत्मनिर्भर संरक्षण अभियान हे एक मोठे स्वप्न आहे. त्यामुळे देशाला बळ मिळेल. सैन्य मजबूत असेल. देशात पैसा वाढेल. भारत जगावर वर्चस्व गाजवेल; मात्र यासाठी सर्वांना एकत्र काम करावे लागेल. हे स्वप्न पूर्ण झाल्यास भारत जगाचे संरक्षण केंद्र बनू शकेल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# गुढी-बिढी अन् भानगड!

काय झालंय ना, आज राजकारणात स्वतःला जिवंत ठेवायचे असेल तर चर्चेत येणारी व्यक्तव्य करण्याचा नवा 'फंडा' राजकारण्यांना सापडला आहे. काहीतरी वेडवाकडं बोला अन् फुकटची प्रसिद्धी मिळवून घ्या. बाकीचं काम, हातात दंडुके घेऊन असलेले माध्यमांचे चाणाक्ष प्रतिनिधी करतातच! हिंदुत्व, हिंदू संस्कृती, थोर पुरुष यावर केलेले भाष्य चांगली प्रसिद्धी मिळवून देते, असा ठाम विश्वासच राजकारण्यांना झाला असावा, म्हणून तर आता गुढीपाडव्यासारख्या परंपरेवर बोलण्याचे धारिष्ट्य नेत्यांचे झाले. आता गुढीची 'गुढी-बिढी' झाली अन् ती जर 'भानगड' वाटू लागली असेल तर हा नक्कीच मानसिकतेचा आणि स्वतःच्या राजकीय अस्तित्वाच्या चिंतेचा परिपाक म्हणावा लागेल.

रोज कुणीतरी माध्यमांसमोर येतो आणि काहीतरी बोलून जातो. अनेकांची अनेक वक्तव्ये वादाला तोंड फोडणारी असतात. आता सामान्य माणसाने काहीही बोलले तरी चालते हो, पण ज्यांच्याकडे आम्ही लाखो लोकांचे प्रतिनिधी म्हणून पाहतो, ज्यांना विश्वासाने जनतेने विधिमंडळाच्या सभागृहात पाठवून सकारात्मक आणि परिणामकारक बदल घडवून आणण्याची संधी दिली आहे, अशा लोकांनी काहीही बोलावे म्हणजे खेदच वाटतो.



विजय, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून आम्ही गुढीपाडव्याच्या सणाकडे पाहतो. ही आमची परंपरा आहे. उंच उंच गुढीप्रमाणे आमचे विचार प्रगल्भ होत जाऊन सकारात्मकतेचे वातावरण तयार होवो, अशीच काहीशी प्रार्थना या गुढीपाडव्याच्या निमित्ताने प्रत्येक जण करीत असावा. आत्मनिरीक्षण, कृतज्ञता, समृद्धी, शांतीसाठी देवाचे आशीर्वाद मिळविण्याची संधी म्हणूनही गुढीपाडव्याकडे पाहिले जाते. प्रत्येक हिंदूंची आस्था आणि श्रद्धेचे प्रतीकही हीच गुढी आहे. पण झालं काय? स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्या एका नेत्याला अचानक ही गुढी 'बिढी' वाटू लागली अन् ती उभारणे म्हणजे 'भानगड'. आता मला सांगा, ज्या विजय वडेट्टीवारांनी गुढीला भानगड म्हटले, त्यांनी हातात भगवा घेऊन यापूर्वी गुढी उभारली नाही का? शिवसेनेत असताना या सर्व भानगडी त्यांनी खरंच केल्या नाहीत का? मग तेव्हा गुढी उभारण्याची भानगड करताना मनात, अंतःकरणात असलेले हिंदू अचानक कसे काय पुसट झाले, साहेब! संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरचा दुसऱ्या दिवशी गुढीपाडवा करून आनंद साजरा करायचा का म्हणणाऱ्या वडेट्टीवारांना यापूर्वी हे का सुचले नाही मग?

आज राज्यात वातावरण बदलते आहे. आपले राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी काहीतरी विधान करून चर्चेत राहणे गरजेचे आहे, कळल्यानंतर विजूभाऊसुद्धा अन्य वाचाळांच्या रांगेत जाऊन बसले. हिंदूंच्या गुढीपाडवा सणाबद्दल आक्षेपार्ह बोलून त्यांनी जी काही प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न केला, तो नक्कीच केविलवाणा होता. शिवसेनेत असताना अगदी कर्मठ हिंदुत्ववादी वैदर्भीय नेता, अशी त्यांची ओळख होती. पण आज काँग्रेसच्या विचारांचा पगडा त्यांना असे काहीतरी बोलण्यास बाध्य करीत आहे, हे तेवढेच खरे! गुढीपाडवा भानगड म्हणताना कधीतरी इतर धर्मीयांच्या प्रथा, परंपरा, सणांवर बोलण्याचे धाडस दाखविले जाईल का हो?

वडेट्टीवारांच्या या वक्तव्यावर आ. संदीप जोशी यांनी दिलेली प्रतिक्रियाही तेवढीच बोलकी आहे. अर्थार्जनासाठी मुलीला बार उघडून देणाऱ्या वडेट्टीवारांकडून दुसरी कोणती अपेक्षा केली जाऊ शकते, असे म्हणत हिंदू असून हिंदूंच्या बाबतीत असे बोलणे खेदाचे असल्याचे ते म्हणाले. आता संदीप जोशी यांचे हे विधानही विचार करण्यास भाग पाडणारे आहे. आरोप-प्रत्यारोप हा राजकीय भाग म्हणून सोडला तरी खरंच ज्या हिंदुत्वाचा झेंडा घेऊन आपल्या राजकारणाला सुरुवात झाली, त्यातूनच तुमचे व्यक्तिमत्त्व घडले, लोकांनाही ते भावले. अशा हिंदुत्वाच्या प्रथा-परंपरांविषयी घेतलेली नकारात्मक भूमिका राजकारणीय स्वार्थ डोळ्यांपुढे ठेवून असेल तर नक्कीच हा प्रकार केविलवाणा आहे. मग अशावेळी गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देण्याचा अधिकारही कसा असेल तुम्हाला! आज महाराष्ट्रात काही वाचाळवीर कायम तोंडाची वाफ व्यर्थ घालवीत असतात. आता तर माध्यमांनाही ते नकोसे वाटू लागलेलं, अशावेळी नव्यांची भर पडून, आपणच आपल्या संस्कृतीचा उद्धार करू नये म्हणजे झाले?

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# श्रीरामायण : भारताचा देदीप्यमान, अस्सल इतिहास!

भगवान श्रीराम हे कपोलकल्पित पात्र असून, रामायण ही केवळ कविकल्पना आहे, असा अपप्रचार काही छद्मधर्मनिरपेक्षवादी आणि अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले वोकिझमवाले करीत असतात. रामसेतू तोडण्यात यावा यासाठी काँग्रेसच्या महाभागांनी राम ही केवळ कविकल्पना अशा आशयाचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले होते. करोडो भारतीयांचे प्रेरणास्थान, आदर्श राजे, आदर्श पती, भाऊ, पुत्र, मित्र, प्रजापालक असलेले भगवान श्रीराम सर्वांचा आदर्श आहेत. शौर्य, धैर्य, पराक्रम यांचे प्रतीक म्हणजे भगवान श्रीराम. एकपत्नी, एकवचनी, एकबाणी असलेले भगवान श्रीराम. भारतीय संस्कृतीचा प्राण म्हणजे भगवान श्रीराम. भगवान राम कविकल्पना नसून ते आपले भारतीयांचे इतिहास पुरुष आहेत. महर्षी वाल्मीकि आणि भगवान श्रीराम हे समकालीन आहेत. श्रीरामाचा काळ नेमका कोणता यावर चर्चा होत असली, तरी सर्व विद्वानांचे मतसार घेतले तर तो कालावधी किमान इ. स. पूर्व ७००० असावा. म्हणजे आजपासून ९००० वर्षांपूर्वीचा असेल. त्या काळात बखरी किंवा पत्र नव्हते तर महापुरुषांचा इतिहास काव्यरूपात लिहिला जात असे. रामायण या महाकाव्यात भगवान श्रीरामांचे चरित्र प्रत्यक्ष साक्षीदार असणाऱ्या महर्षी वाल्मीकि ऋषींनी लिहिले आहे. स्वतः वाल्मीकिच रामायणात युद्धकांडात १२८ व्या सर्गात ११४ व्या श्लोकात लिहितात-

**पूजयश्च पठैश्चैव, इतिहासं पुरातनं ।**

वाल्मीकि आदिकवी आहेत. त्यांनी स्पष्ट लिहिले की, हा इतिहास आहे. आपण दरवर्षी श्रीरामनवमी म्हणजे भगवान रामचंद्रांचा जन्म दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतो. जयंती किंवा पुण्यतिथी या काल्पनिक व्यक्तींच्या नसतात तर त्या अस्तित्वात होत्या त्या महापुरुषांच्याच साजऱ्या होतात. भारताचा भूगोल पाहिला तर वाल्मीकि रामायणात उल्लेख असलेली अयोध्या नगरी, श्रीलंका, पंचवटी, किश्किंधा अशा अनेक नगरी आजही अस्तित्वात आहेत. वाल्मीकि रामायणात उद्धृत नद्या, पर्वत आणि अरण्य आजही अस्तित्वात आहेत. गंगा, यमुना, मंदाकिनी, गोदावरी इत्यादी नद्या, ऋषमुख पर्वत, विंध्य, हिमालय, महेंद्र, मलय असे पर्वत इतिहाससाक्ष आहे. ज्या रामसेतूला तोडण्याचा प्रयत्न झाला तो रामसेतू कसा बांधला, याचे वर्णन युद्धकांडात २२ व्या सर्गात ६० व्या आणि ६५ व्या श्लोकात आहे.

**हस्तिमात्रांत महाकायः, पाषाणश्च महाबलः ।**
**पर्वतांश्च समुत्पाट्य, यंत्रैः परीवहंतीच ॥**



रामसेतू तयार करताना नळाने हत्तीच्या आकाराच्या शिळा, महेंद्र पर्वतासारखे पर्वत कापून यंत्रांच्या साह्याने आणल्याचे वर्णन आहे.

'तरुभिःसेतू बध्नंति वानरः।' म्हणजे मोठमोठ्या वृक्षांची लाकडे त्या सेतूवर लावली होती. हा सेतू बांधताना पाच टप्पे पाडले होते. त्यात अनुक्रमे १४ योजने, २०, २१, २२, २३ अशा पाच टप्प्यांत १०० योजने हा सेतू तयार केल्याचे वर्णन आहे. हा सेतू आजही अस्तित्वात आहे. भगवान ज्या मार्गाने अयोध्या ते पंचवटी आणि पंचवटी ते श्रीलंका गेले तो मार्ग, ती स्थाने आजही अस्तित्वात आहेत. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात भगवान रामभद्रांचा स्पष्ट उल्लेख आहे.

**भद्रो भद्रया सचमान आगात्स्वसारं जारो अभ्येति पश्चात् ।**
**सुप्रकेतैर्द्युभिरग्निर्वितिष्ठन्रुशद्भिर्वर्णैरभि राममस्थात् ।**

इथे भद्र म्हणजे रामभद्र, भद्राया म्हणजे सीतामाता, इथेच रावणाचाही उल्लेख आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीत भारद्वाज संहितेतही स्पष्ट उल्लेख आहे.

**अवताराः बहवः सन्ति कलाश्चांशविभुतयः।**
**राम एव परंब्रह्म सच्चिदानन्दाव्ययम्॥**

कला, अंश, अंशांश, विभूती असे अवताराचे प्रकार सांगतांना राम हे सच्चिदानंद स्वरूप परब्रह्म असल्याचा उल्लेख आहे. स्वतः श्रीराम मात्र मी मनुष्यच आहे, राजा दशरथाचा मी पुत्र असल्याचे सांगतात.

**आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम् ।**
**योऽहं यस्य यतश्चाहं भगवांस्तद्ब्रवीतु मे ॥**

कितीतरी ठिकाणी भगवान रामचंद्रांचा प्रत्यक्ष पुरावा दिसतो. अभ्यासकांनी प्रचंड अभ्यास करून अयोध्या ते श्रीलंका हा मार्ग शोधून काढला आहे. महाकुंभ मेळ्यात गेलेल्या कोट्यवधी लोकांनी त्रिवेणी संगम काठावर श्रीराम कुठे थांबले होते, गुह राजांनी त्यांना गंगापार कुठल्या स्थानावरून केले ती स्थाने पाहिली आहेत. महाकवी कालिदासांनी रघुवंशात वर्णन करताना इथे कोणती झाडे आहेत, मसाल्याचे पदार्थ, मोती-शिंपल्याची शेती यांचे वर्णन आहे.

अज राजांच्या काळातील सर्व बाबी आजही जशाच्या तशा जुळतात. महाभारत युद्धात देशोदेशीच्या राजांनी सहभाग नोंदविला होता.याच युद्धात भगवान श्रीरामांच्या साधारण ३२ व्या पिढीतील राजा बृहद्बल यांनी सहभाग घेतल्याचे महाभारत सांगते. अनेक साधुसंतांनी आपल्या ग्रंथातून भगवान श्रीरामाचा उल्लेख केलेला आढळून येतो. 'श्रीगुरुग्रंथसाहेब' या पवित्र ग्रंथात अडीच हजार वेळा श्रीरामनाम आहे. उत्तरेत तुलसीरामायण, मराठीत भावार्थ रामायण, पंजाबीत गोविंद रामायण, कानडीत पंप रामायण, तेलगूत मल्लरामायण, तामिळमध्ये कंब रामायण, बंगालीत कृत्तिवास रामायण इतकेच नाही तर आंग्ल, जर्मन, इटालियन, चिनीसह अनेक विदेशी भाषांत रामायण लिहिले गेले आहे. त्यातील कुटुंबव्यवस्था, एकमेकांविषयीचा जिव्हाळा, प्रेम आदर, संस्कार याबद्दल सर्वांनाच आस्था आहे. श्रीराम हे इतिहासपुरुष आहेत आणि श्रीरामायण हा अस्सल इतिहास आहे.

या देशात आदर्श घ्यावा असे तीन युगपुरुष राजे होऊन गेले ते म्हणजे राजे श्रीरामचंद्र, राजे श्रीकृष्णचंद्र आणि राजे छत्रपती शिवाजी महाराज. हे तिन्ही राजे आपला इतिहास आहेत. ते आपले प्रेरक आहेत. म्हणूनच भगवान श्रीराम हे आपले आदर्श आहेत. ते काल्पनिक पात्र नसून ते आपला देदीप्यमान आणि अस्सल इतिहास आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### एक तरी हायब्रीड मार्गिका हवी !

एमएसआरडीसी महामंडळाच्या अखत्यारीतील टोलनाक्यांवर फास्टॅगद्वारे पथकर न भरणाऱ्या वाहन चालकांकडून दुप्पट कर आकारला जाणार, त्यासाठी सर्व मार्गिका फास्टॅगमध्ये रूपांतरित करण्यात आल्याची बातमी वाचण्यात आली. खरंतर दुप्पट आकार स्वीकारणार हे नाही म्हटलं तरी अन्यायकारक आणि वाहनचालकांना त्रासदायक, एक प्रकारे भुर्दंडच आहे असं म्हटल्यास ते चुकीचे होईलच असे नाही? एमएसआरडीसीने याबाबत पुनर्विचार करून निदान एक तरी मार्गिका हायब्रीड पद्धतीची ठेवण्यात यावी जेणेकरून अन्य मार्गानेही वाहनचालकांना आपला पथकर भरता येईल.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### विदर्भ सिंचन अनुशेष अन्यायकारक

नुकतीच तरुण भारतात विदर्भ सिंचन अनुशेष प्रकरणी एक बातमी प्रसिद्ध झाली, ती अशी की, विदर्भ सिंचन अनुशेष प्रकरणी मुख्य सचिवांना शेवटची संधी. तीन आठवड्यांत उत्तर सादर करण्याचा न्यायालयाचा आदेश.

विदर्भातील केवळ ३५ टक्के सिंचन प्रकल्प पूर्णत्वास गेले आहेत. सिंचन प्रकल्पाचा अनुशेष का? अशी विचारणा करीत राज्याच्या मुख्य सचिवांनी यावर तीन आठवड्यांत उत्तर द्यावे असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. विशेष म्हणजे अनुशेषाबाबत उपाययोजना करण्यासाठी वारंवार आदेश देऊनही पूर्तता न झाल्यामुळे मुख्य सचिवांना अवमानना नोटीस बजावण्याचे संकेतच न्यायालयाने दिले होते. विदर्भातील एकूण १३१ प्रस्तावित प्रकल्पांपैकी केवळ ४६ अर्थात सुमारे ३५ टक्के सिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातच राज्य सरकार बंद पडलेले प्रकल्प सुरू करीत आहे, अशी माहिती खुद्द राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी दिली होती.

देशामध्ये विदर्भात शेतकरी आत्महत्या सर्वांत जास्त होत आहे असे असतानाही अशा प्रकारे सिंचन अनुशेष असावा, ही दयनीय स्थिती आहे. सांगली येथील टेंभू प्रकल्पासाठी ६००० कोटी, तर पुण्यातील एका नदी प्रकल्पासाठी ४००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अशात ११ जिल्ह्यांच्या विदर्भाला केवळ दोन हजार कोटी दिले जातात, हे अत्यंत अन्यायकारक आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### छावाची शिकवण

'छावा' चित्रपट प्रदर्शित झाला आणि पुन्हा इतिहासाची उजळणी झाली. काही जणांना पहिल्यांदाच इतिहास समजला. आपला समाज जणू जागृत झाला. काहींनी चित्रपट गृहातच संताप व्यक्त केला तर काहींनी देशभक्तीचे नारे देऊन देशाप्रति प्रेम व्यक्त केले. धर्मवीर आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा झालेला छळ पाहून औरंगजेबाचे थडगे हटवून टाकण्याची मागणी केली . समजा ती मागणी मान्य झाली तर पुढे काय? मग पुन्हा मराठा आरक्षणाची आठवण होईल. दुसरी जात त्याला विरोध करेल. काही जातींना भटक्या जातीतून मागासवर्गीयांत टाकण्यास आंदोलन होईल, मग मागासवर्गीय त्याला विरोध करतील. त्यावेळी कुठे जाते आपली देशभक्ती? छत्रपती शिवरायांना आणि छत्रपती संभाजी राजांना ही जाती जातीत तेढ अपेक्षित नाहीच. आजची गरज जातिविरहित समाजाची. ज्यावेळी संपूर्ण हिंदू समाज जातिविरहित होईल तोच काळ खरा सुवर्ण युग असेल. आम्ही सारे एक आहोत हे दाखवण्यासाठी पाकिस्तान विरुद्ध कोणत्याही स्पर्धेची व युद्धाची गरज नाही किंवा कुंभमेळ्याची गरज नाही. आपल्या समाजाला इतिहास काळापासून फितुरीची जी कीड लागली आहे, ती नाहीशी करून आपण सर्व एक होऊन जातिविरहित हिंदू समाजाची निर्मिती करू. हीच खरी छावा या चित्रपटाची शिकवण आहे .

**किशोर केळापुरे**/९८२३०४७९२४

### शालेय शिक्षण सक्तीचे करा

केंद्र सरकारने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) अंतर्गत इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनानेही इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार करणे गरजेचे आहे. सध्या अनेक विद्यार्थी कॉलेज टाईपच्या नावाने खाजगी शिकवणी वर्गात धुमाकूळ घातला असून त्यांचे शिक्षण बाह्य शिक्षण संस्थांवर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार आणि नियोजनबद्ध शिक्षण मिळावे, तसेच शालेय जीवनातील शिस्त, शैक्षणिक वातावरण आणि एकसंध अभ्यासक्रम यांचा लाभ मिळावा, यासाठी हा निर्णय आवश्यक आहे. त्यामुळे राज्य शासनाने लवकरात लवकर हा निर्णय घ्यावा.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# गुणवंत विद्यार्थी आणि उपक्रमशील ज्ञानदाते शिक्षक हेच, आपल्या जिंतूरचे वैभव- ना.साकोरे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** गटशिक्षण अ[illegible] कार्यालय पंचायत समिती जि[illegible] आयोजित दिनांक २८ मार्च २०२५ रोजी निपुण ट कृती कार्यक्रमांतर्गत तालुकास्तरीय कार्यप्रेरणा शिक्षण परिषद, पारितोषिक वितरण आणि गुणगौरव सोहळा श्री राधाकृष्ण मंगल कार्यालय ग्रीन पार्क -२ जिंतूर येथे मा. ना. सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला.





या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना ट राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री यांनी गुणवंत विद्यार्थी आणि असे विद्यार्थी घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे उपक्रमशील ज्ञानदाते शिक्षक यांचे विशेष कौतुक केले . शिक्षक हे उद्याचे उज्वल भविष्य घडवत असतात. सक्षम राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षकांचे मोठे योगदान . समाजजीवन आणि संपूर्ण समाजाचा शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक विकास करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शाळा महत्त्वाच्या आहेत . अशा शाळांना सर्व प्रकारच्या भौतिक सोयी सुविधा मिळवून देणे यासाठी शासन प्राधान्याने काम करत . प्रधानमंत्री श्री शाळा, मुख्यमंत्री श्री शाळा भौतिक सोयीसुविधेसह विविध उपक्रमाने आदर्श शाळा निर्माण होत . याच धरतीवर आधारित परभणी जिल्ह्यात पालकमंत्री श्री शाळा निर्माण करणे हे माझे ध्येय आहे . यासाठी मी पालकमंत्री श्री शाळा विकास आराखडा तयार करणार . त्यानुसार संपूर्ण जिल्ह्यात काम करण्याचा माझा मानस आहे . मा. मुख्यमंत्री महोदय आणि ट शासन शिक्षणाच्या विकासासाठी प्रयत्नशील . खेड्यापाड्यात, ग्रामीण भागात, दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे अशी शासनाची आग्रही भूमिका . शिक्षण विभागाच्या माध्यमातून यासाठी विविध उपक्रम नियोजित केले जात आहेत . या विविध उपक्रमांमध्ये माझा परभणी जिल्हा सर्व बाबतीमध्ये अग्रेसर . याचा मला अभिमान . विशेषत: जिंतूर तालुक्यात या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम, कृती कार्यक्रम व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . या वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या शालेय शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आपल्या कर्तुत्वाचा आणि गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात करताना मला विशेष आनंद होत . या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी मी ४०० स्मृतीचिन्ह आणि २००० प्रमाणपत्र तयार करून घेतले. या भव्य कार्यक्रमात हे वितरण करत असताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून विशेष समाधान वाटले....अत्यंत व्यस्त जीवन शैली मधून देखील माझ्या जिंतूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचा सन्मान करायला मला गेलेच पाहिजे या आंतरिक ओढीने मी या कार्यक्रमास उपस्थित राहिले.... या पुढील काळात देखील सर्व शिक्षकांनी बदलत्या काळानुसार आपल्या भूमिका, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या याची जाणीव ठेवून प्रामाणिकपणे ज्ञानवंत, गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे काम सुरू ठेवावे. विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी ट शासन कटिबद्ध . मा. मुख्यमंत्री शिक्षण आणि शिक्षक यांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. या भव्य कार्यक्रमात एकूण १५०० विद्यार्थी ७५० शिक्षक,विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, प्रतिष्ठित व्यापारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे दिसून आले. या कार्यक्रमासाठी राजेश सरवदे तहसीलदार जिंतूर, सुभाष मानकर गटविकास अधिकारी जिंतूर, दंडवते मुख्याधिकारी नगरपालिका जिंतूर, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, विस्तार अधिकारी ज्ञानोबा साबळे , नारायण मुंडे, मा. जि प उपाध्यक्ष प्रभाकर वाघीकर, गोविंद थिटे, प्रताप देशमुख, संतोष कदम, शिवाजी खिस्ते केंद्रप्रमुख रवींद्र भताने , प्रकाश पांडे, ओमप्रकाश बाहेती,केशव घुगे, दिलीप रेंगे,मारुती घुगे, पांडुरंग भांबळे, दिनकर घुगे, देवानंद सावंत, मनोज तोडकर, राजेंद्र ढाकणे, लक्ष्मण टाकणसार, शंकर दांडगे, सोपान खताळ,दत्तराव पोले, तुकाराम चव्हाण,शंकर खिस्ते, मधुकर घनसावंत हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी तर सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी, देवानंद सावंत, जयानंद मत्रे,माधव गडदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभाकर नालंदे, रवी राठोड, सचिन चव्हाण, योगिता संगवई, रत्नमाला तोडकर, नितीन पेठे, हनुमान गायकवाड,सुनील फड, श्रावण वैरागड, शंकर दांडगे, शंकर माने, सचिन हजारे,शिवाजी टेकुलवार,अमोल स्वामी, सुनिता मगर, अलका खिल्लारे, गजानन कुरे यांच्यासह सर्व मुख्याध्यापक सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.



**जिंतूर- श्री.क्षेत्र पोहरादेवी धर्मपीठाचे धर्मगुरु विधानपरिषद सदस्य बाबूसिंग महाराज यांचा सत्कार करुन आर्शिवाद घेतांना कृउबा जिंतूरचे संचालक प्रमोद चव्हाण, संचालक रामराव घुगे, श्यामसुंदर मस्के, पुरुषोत्तम घुगे, विकास जाधव, चव्हाण व भक्तगण दिसत आहे.**

## जयंती समितीच्या अध्यक्षपदी तुपसमूद्रे

**मानवत,/प्रतिनिधी:** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती, अगदी उत्साहात साजरी केली जाणार असून, यासंदर्भात १ एप्रिल रोजी जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी संदर्भात महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन, तथागत युवा मंचाच्या वतीने करण्यात आले होते, यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी उपाध्यक्षपदी अविनाश तूपसमुंद्रे, सहसचिव संतोष तूपसमुंद्रे, सचिव विश्वजीत तूपसमुंद्रे, कोषाध्यक्ष निशांत तूपसमुंद्रे, मार्गदर्शक जयवंत तूपसमुंद्रे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

# परीक्षार्थी होण्यापेक्षा ज्ञानार्थी व्हावे- नखाते

## शांताबाई नखाते विद्यालय पाथरी येथे वासंतिक वर्गाचे उद्‌घाटन संपन्न




**पाथरी,/प्रतिनिधी :** शालेय जीवनामध्येच विद्यार्थ्यांना ज्ञानाचा पाया भक्कम करण्याची संधी असते, परीक्षेच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यापेक्षा ज्ञानार्जनासाठी अभ्यास करणे गरजेचे आहे म्हणूनच परीक्षार्थी होण्यापेक्षा ज्ञानार्थी व्हावे असे प्रतिपादन राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी ट प्रदेशचे सरचिटणीस अजिंक्य नखाते यांनी केले.

दिनांक २ एप्रिल २०२५, मंगळवार रोजी शांताबाई नखाते विद्यालय,शिवाजीनगर पाथरी ता.पाथरी जि. परभणी येथे इयत्ता नववी व अकरावी तून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित वासंतिक वर्ग उद्घाटन समारंभ प्रसंगी उद्घाटक या नात्याने ते बोलत . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य के. एन. डहाळे हे . तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक नवनाथ यादव, उपमुख्याध्यापक राज गुंडेकर विशाल घांडगे, प्रा. सचिन चव्हाण आदी उपस्थित . याप्रसंगी अभ्यासक्रमातील निकष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टुडन्ट ऑफ द इयर हे पदक देऊन सन्मानित करण्यात आले. वाल्मीक ऋषी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून वासंतिक वर्गाचे उद्घाटन करण्यात आले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम शेळके यांनी केले तर माणिक शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास इयत्ता नववी व अकरावी उत्तीर्ण विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेलूत पाऊस थेंबभर लाईट गायब रात्रभर...

## तालूक्यातील ग्रामीण भागात अंधार

## परतूर व पाथरी ब्रेक डाऊन सप्लायमूळे ग्राहकांचे हाल

**सेलू,/प्रतिनिधी :** तालूक्यात थेंबभर पडलेल्या पावसामूळे शहरासह ग्रामीण भागाचा विज पूरवठा खंडीत झाल्याने ग्रामीण भागातील नागरीकांना रात्र अंधारात काढावी लागल्याने पाऊस थेंबभर लाईट गायब रातभर यांची प्रचिती आली.मंगळवार रात्री तालूक्यात ढगाळ वातावरणामूळे तालूक्यात पावसाच्या सरी कोसळल्या त्यातच १३२ के.व्ही.केंद्र परतूर व पाथरी येथून विद्यूत पूरवठा खंडीत झाला. रात्रीची वेळ असल्याने विद्यूत पूरवठा सूरळीत करण्यासाठी पर्यायी यंत्रणा उपलब्ध होत नसल्याने मंठा उपकेंद्रातून सेलू शहराचा विद्यूत पूरवठा सूरळीत करण्यात आला.मात्र ग्रामीण भागातील ३३ केव्ही उपकेंद्र वालूर,कान्हड,ढेंगळी पिंपळगाव व हादगाव पावडे ही केंद्रे बंद असल्याने या उपकेंद्रातंर्गत असलेल्या गावातील नागरीकांना रात्र अंधारात काढावी लागली मोजका पाऊस पडला असल्याने व उन्हाचे दिवस असल्यामूळे नागरीकांना उकाडा जाणवत असल्याने बाल वृद्धांचे हाल झाले दरम्यान महावितरणकडे आपातकालीन पर्यायी व्यवस्था नसल्याने अनेक गावातील विद्यूत पूरवठा सूरळीत करता आला नाही.मागील अनेक महिन्यापासून वारंवार होत असलेल्या नादूरूस्त विद्यूत पूरवठ्यास नागरीक त्रस्त झाले आहेत.शहरात अनेक वेळा विद्यूत पूरवठा खंडीत केला जात आहे.महावितरणला सदरिल विद्यूत पूरवठा सूरळीत कसा करता येईल याचा ताळमेळ बसत नसल्याने विज ग्राहकांना नाहक त्रासाचा सामना करावा लागत आहे . मूख्यालयी राहण्याचे वावडे महावितरण विभागात उपविभागीय कार्यकारी अभियंता हे मूख्यालयी राहतात त्र सहाय्यक अभियंता नांदेड व परळी या ठिकाणाहून आठवड्यातील काही दिवस कार्यालयात हजेरी लावत असल्याने नेमका प्रोब्लेम काय आहे व कर्मचारी यांच्यात समन्वय साधणता येत नसल्याने विद्यूत पूरवठा खंडीत झाल्यास अडचणी येत आहेत.

# भाऊसाहेब खरात यांना जिल्हा आदर्श बालविकास प्रकल्प अधिकारी पूरस्कार

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** महिला व बालविकास विभागाच्या वतिने यशोदा माता जिल्हास्तरीय आदर्श बालविकास प्रकल्प अधिकारी पूरस्कार सेलू येथील बालविकास प्रकल्प अधिकारी भाऊसाहेब खरात यांना शनिवार २९ रोजी परभणी येथे जिल्हा परिषद अंतर्गत लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे वितरीत करण्यात आला.



यावेळी मूख्यकार्यकारी अधिकारी नतिशा माथूर,उपमूख्यकार्यकारी अधिकारी (बा.क.) रेखा काळम,प्रकल्प संचालक शिवराज केंद्रे आदींची उपस्थिती होती .बालविकास प्रकल्प अधिकारी भाऊसाहेब खरात यांनी मूख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची प्रभावीपणे आमंलबजावणी केली ,अंगणवाडी स्वच्छता व नाविण्यपूर्ण उपक्रम,कूपोषणाचे प्रमाण कमी करणे ,लेक लाडकी योजनाची अंमलबजावणी,अंगणवाडीतील रेकाँर्ड अद्यावत ठेवण्यात आले असल्याने सदरिल पूरस्कार देण्यात आला . महिला व बालविकास विभागाच्यावतिने बालविकास प्रकल्प धिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका,मदतनिस यांना पूरस्कार देण्यात येतो. सन २०२४-२५ या वर्षीचा आदर्श बालविकास प्रकल्प अधिकारी पूरस्कार भाऊसाहेब खरात यांना देण्यात आला असल्याने त्यांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.जिल्हा परिषद महिला व बालविकास विभागाच्या वतिने बालविकास प्रकल्प अधिकारी एक ,पर्यवेक्षिका तीन,अंगणवाडी सेविका तीन, मदतनिस तीन असे जिल्हाभरातून प्रस्ताव मागविण्यात आले.

## वाढत्या उन्हामुळे बालकांच्या आरोग्यात बिघाड

**परभणी,/प्रतिनिधी:** गेल्या एक महिन्यापासून उन्हाची तीव्रता हळुहळूवारपणे जाणवू लागली आहे. त्याचा परिणाम म्हणजे नागरिक सकाळपासून तोंडाला रुमाल बांधून गाडीवर तसेच अन्य वाहनाने जात असतांना दिसतआहेत. शिवाय बाजारपेठेत देखील गमछे, रुमाल, टोपी यासह अन्य साहित्य विक्रीसाठी मोठया प्रमाणात दाखल झाले आहे. सध्या जिल्हयाचे तापमान ४० अंशावर आहे. त्यामुळे नागरिक या उन्हाच्या झळा आतापासूनच म्हणजे मोठया प्रमाणात जाणवू लागल्या आहेत. यातच वाढत्या उन्हाचा परिणाम बालकांच्या आरोग्यावर मोठया प्रमाणात परिणाम दिसून येत आहे. बालकांना यामुळे संडास, उलटी, ताप यासह अन्य आजारांची लागण होत आहे. त्यामुळे बालरोग तज्ञ डॉ.गुंडेवार यांनी लहान मुलांची उन्हाळयात विशेष काळजी घेवून त्यांच्या आरोग्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

# डॉ. रोडगे यांचा श्रीराम प्रतिष्ठानतर्फे भव्य सत्कार

**सेलू,/प्रतिनिधी :** श्रीराम प्रतिष्ठान संचालित विविध घटक संस्थेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी आज प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांचा लोकमत ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड मिळाल्याबद्दल सत्कार . शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.शनिवार २२ रोजी श्रीराम प्रतिष्ठान येथे सत्कार करण्यात आला.

हा मानाचा पुरस्कार हाँगकाँग येथील मकाऊमध्ये आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.शनिवारी सकाळी डॉ. संजय रोडगे यांचे येथील एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल येथे आगमन झाल्यानंतर, श्रीराम प्रतिष्ठान संचालित घटक संस्थेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी त्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्यास प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, कार्तिक रत्नाला, प्रगती शिरसागर, अशोक बोडखे, नारायण चौरे, बाजीराव मोगल, राजेंद्र देशमुख, मीरा मिरिंडा, बालाजी बामणे, भूषण रोडगे, सीमा सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. संजय रोडगे यांच्या या सन्मानामुळे संपूर्ण संस्थेच्या व शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# जिंतूरमध्ये रामराव महाराज गड ते पहिरागड पदयात्रेचे भव्य स्वागत



**जिंतूर,/प्रतिनिधी-** रामराव महाराज गड ते पोहरागडकडे जाणाऱ्या पदयात्रेचे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तालुक्यातील बंजारा समाजाच्या नेते बन्सी सेठ राठोड, अमित राठोड, माजी सरपंच सुधाकर जाधव, विलास चव्हाण, सचिन राठोड, तुकाराम चव्हाण, देविदास राठोड, आकाश राठोड, जीवन जाधव, बालाजी आडे यांच्या वतीने दि.३० मार्च रविवार रोजी शहरातील हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक पूर्णाकृती पुतळ्याजवळ स्वागत करण्यात आले. पोहरागड दिंडीत सहभागी असलेल्या सर्व वारकऱ्यांना येथील संत सेवालाल महाराज मित्र मंडळाच्या वतीने चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड, काठोडा येथील देवी सेवालाल महाराज ट्रस्ट यांच्या नावाने निघणारी ही पदयात्रा दि.२१ मार्च पासून निघाली . जवळपास ३०० किलोमीटरची पायी अंतर चौदा ते पंधरा दिवसात पार करण्यात येणार . मागील अनेक वर्षांपासून ही पदयात्रा अविरतपणे सुरू असून यंदाही पदयात्रेचे जोरदार तयारी करून काठोडा येथील देवी सेवालाल महाराज ट्रस्ट यांनी पोहरागड येथील संत रामराव महाराज समाधी स्थळाच्या नावाने निघणारीही पदयात्रा म्हणून परिचित . दि.५ एप्रिल रोजी ही पदयात्रा पोहरागड येथे सायंकाळी पोहोचणार . पोहरादेवी संस्थांच्या वतीने देखील या पालखीचे स्वागत करण्याची परंपरा . बंजारा समाजाची काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवी पिठाधिश्वर बाबूसिंग महाराज, जितेंद्र महाराज भक्तीधाम, शेखर महाराज यांच्यासह पोहरावासी या पालखीचे स्वागत करणार . ही पायी दिंडी दि. ३० मार्च रविवार रोजी सकाळी शहरात आल्यानंतर सर्व भक्तांना शहरातील वसंतराव नाईक पूर्णाकृती पुतळा येथे चहा व नाश्ता देण्यात आले. या वेळी बन्सी सेठ राठोड, अमित राठोड, माजी सरपंच सुधाकर जाधव, समाजसेवक सचिन आडे, गोरसेना शहराध्यक्ष सचिन राठोड, नामदेव राठोड, नितीन चव्हाण, पप्पू राठोड, विलास चव्हाण, संजय जाधव, सुधाकर राठोड, लहू आडे, टी. के चव्हाण सर, देविदास राठोड सर, सुमंता राठोड सर यांच्यासह मोठ्या संख्येने बंजारा समाज उपस्थित . महंत सुंदरसिंग महाराज यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी येथील जय हिंद डिफेन्स करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम केले. चहा पाण्यानंतर थोडा वेळ विश्राम केल्यानंतर ही दिंडी पुढे मार्गस्थ झाली.

# भारतीय जनता पक्षाची हिंगोलीत बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**

विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांचा दि ९ एप्रिल रोजी येणार असून त्यांचेहस्ते सेनगाव तालुक्यातील हत्ता येथे २०० कोटींच्या रस्त्याच्या कामांचे उद्घाटन होणार आहे तसेच भाजपचा दि ६ एप्रिल रोजी वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यासंदर्भात बैठक पार पडली.

येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात दि २ एप्रिल रोजी भाजपची बैठक पार पडली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिंह ठाकूर, प्रा दुर्गादास साकळे, ॲड के के शिंदे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि ९ एप्रिल रोजी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे हत्ता येथे २०० कोटींच्या रस्त्याचे कामाचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचेहस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारी संदर्भात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलतांना भारतीय जनता पक्षाचा वर्धापनदिन दि ६ एप्रिल रोजी साजरा करावा. यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन सदस्य नोंदणी अभियान राबवावे तसेच भारतीय जनता पक्षाचे ध्येय धोरणे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहीती देण्यासाठी मंडळ, गाव आदी ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करावे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी त्यांच्या घरावर भाजपचा झेंडा लावून पक्षाचा प्रचार आणि प्रसार करावा, असे आवाहन आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले. हिंगोली येथे सकाळी साडे आठ वाजता जिल्हा कार्यालयात भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहनाचा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमास भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी केले.

बैठकीमध्ये ओबीसी सेलच्या रजनी पाटील, राजु मुंदडा, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, बंडू कऱ्हाळे, आशिष जयस्वाल यांच्यासह हिंगोली, सेनगाव, औंढा नागनाथ येथील भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हिंगोली– येथील जिल्हा परिषदेच्या वसाहतीतील रस्ते, नाली तसेच नळाच्या पाईप लाईनचे कामे युध्द–पातळीवर करण्यात येत आहेत. छाया– सुनील पाठक

# बीएससी ॲग्री विद्यार्थ्यांची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**

औंढा नागनाथ शहरातील नागेश्वर नगर भागात बीएससी ॲग्रीच्या विद्यार्थ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार जामखेड जि अहिल्यानगर येथील कृष्णा पंडितराव काळे वय २२ हा तरूण औंढा नागनाथ तालुक्यातील गोळेगाव येथील कृषी महाविद्यालयात बीएससी ॲग्री या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षात शिक्षण घेतो. शिक्षणाच्या निमित्ताने तो औंढा नागनाथ येथे एका मित्रासोबत खोली करून राहत होता. गुढीपाडव्यामुळे त्याचा मित्र गावाकडे गेला होता. त्यामुळे कृष्णा हा एकटाच खोलीवर होता.

सोमवारी दि ३१ मार्च रोजी सायंकाळी कृष्णाने गळफास घेतला. या भागातून जाणाऱ्या एका मुलाने खिडकीतून हा प्रकार पाहील्यानंतर घटनेची माहीती परिसरातील नागरिकांना कळाली. या घटनेची माहीती पोलिसांना मिळताच पोनि जी एस राहीरे, जमादार गजानन गिरी, रविकांत हरकळ, सुभाष जायताडे, ज्ञानेश्वर गोरे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला त्यानंतर मयत कृष्णा याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी औंढा नागनाथ ग्रामीण रूग्णालयात दाखल केला. तसेच या घटनेची माहीती त्याच्या कुटुंबियांना देण्यात आली. त्यानंतर त्याचे कुटुंबीय औंढा येथे आल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. कृष्णाच्या आत्महत्येच कारण अद्याप स्पष्ट झाले नाही याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिसांनी नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास औंढा पोलिस करीत आहेत.

# हिंगोलीत श्वास क्रिटीकेअर हॉस्पीटलचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**



शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. स्वप्नील गिरी यांचे श्वास क्रिटीकेअर (नवजात शिशु व बाल अतिदक्षता विभाग) हॉस्पिटलचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गंगलवाडी संस्थांची महंत आत्मानंद गिरी महाराज यांच्या हस्ते फित कापून व विधीवत पूजा डॉ स्वप्निल गिरी व त्यांच्या पत्नी रचीता गिरी यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. तानाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण, डॉ दीपक डोणेकर, आय डॉ सचिन बगडीया, सह्याद्री हॉस्पिटल चे संचालक डॉ यशवंतराव पवार, डॉ शिवाजी गीते, गणेश गरड, दिवाकर माने, रवींद्र वाढे, ॲड सुनिल भुत्कर, प्रितम सरकटे आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ स्वप्नील गिरी यांनी त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्यकाळाची सखोल माहिती सांगून अगदी छोट्याशा ग्रामीण भागातून आलेल्या आपल्या अनेक खडतर प्रवासा बाबत माहिती देऊन अनेक बालकांना गंभीर आजारासाठी नांदेडला जावे लागत होते आता त्या सर्व सुविधा आपल्याच हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले तसेच सर्व उपस्थितयांचे आभार मानले. यावेळी श्वास फार्मसी व गुरुमाऊली एजन्सी अँड मेडिकलचे संचालक गणेश गरड अशोकराव खूनकर, अमोल गिरी, मनोहर गिरी, आशिष पर्वत, रामेश्वर गिरी, आर्कि रचिता गिरी, स्वराली गिरी, डॉ. स्वप्नील गिरी यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक इंगोले तर आभार प्रदर्शन डॉ. स्वप्नील गिरी आणि त्यांच्या पत्नी आर्कि रचिता गिरी यांनी मानले.



हिंगोली– वन विभागाच्यावतीने कार्यालयाच्या परिसरात मध्यवर्ती रोपवाटीका तयार करण्यात येत असून जांभूळ, साग, कांचन, सिसू, करंज, आवळा, चिंच, जांब, बदाम, जास्वंद, मोगरा आदी रोपांना येथील महिला कामगार पाणी देत या रोपांची काळजी घेतांना दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### आरोही पतंगेला ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक



हिंगोली– येथील एबीएम इंग्लिश स्कूल मधील चौथ्या वर्गाची विद्यार्थिनी आरोही अश्विन पतंगे हिने एमटीएस ऑलिम्पियाड परीक्षेत राज्यातून विसावी येण्याचा मान मिळवला आहे. ती सुवर्णपदक विजेती ठरली असून तिने केंद्रातून तिसरा क्रमांक पटकावला आहे. आरोही ही महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर, येथील माजी प्राचार्य डॉ.बळीराम पानपट्टे यांची नात आहे. या यशाबद्दल आरोही चे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. याबद्दल आई रोहिणी पतंगे, वडील अश्विन पतंगे, अशोकराव चंद्रवंशी, अश्विन चंद्रवंशी, डॉ. प्रकाश अंभोरे, मंजुषा अंभोरे, डॉ. वैष्णवी अंभोरे, वच्छलाबाई पतंगे, ए बी एम शाळेचे अध्यक्ष दिलीपराव बांगर व प्राचार्य रॉबिन वर्गीस यांनी आरोहीचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आरोही पतंगे हिचे यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक केल्या जात असून तिच्या पुढील भवितव्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### मुख्य मंडपासमोर निशुल्क चप्पल स्टँड



हिंगोली– माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या मधुर वाणीतुन श्रीराम कथा ज्ञानयज्ञाला हजारो भाविक भक्त येत आहेत. या मुख्य मंडपासमोर चप्पल व बुट स्टॅन्ड उभारण्यात आले असुन यामध्ये श्री रेणुकाई नवदुर्गा महोत्सव समिती देवडा नगर, हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघ(कॅट संलग्नित) व श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समिती पदाधिकारी व सदस्य ज्ञानयज्ञ कालावधीत सेवा करीत आहेत. श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळा महामंडळेश्वर माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या मधुर वाणी दि. ३० मार्च रोजी पासुन मंगळवारा दत्त मंदिर येथे सुरु आहे. या कथेचे श्रवण करण्याकरिता हजारो भाविक भक्त येत आहेत. मुख्य मंडपाचे पावित्र्य ठेवण्याकरिता मंडपासमोर श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीने चप्पल व बुट स्टॅन्ड उभारले आहे. या स्टॅन्डमध्ये श्री रेणुकाई नवदुर्गा महोत्सव समिती देवडा नगर, जिल्हा व्यापारी महासंघ(कॅट संलग्नित) व श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समिती पदाधिकारी व सदस्य ज्ञानयज्ञ कालावधीत सेवा करीत आहेत. संपुर्ण कथास्थळी भक्तीरसाने भारलेले वातावरण असुन या ठिकाणी अनेक सेवा सुरु आहेत.

# पदभार स्विकारताच सीईओंनी घेतला सर्व विभागाचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दि १ एप्रिल रोजी पदभार स्विकारला. पदभार स्विकारताच त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेवून विभागांचा आढावा घेतला.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या जागी मध्य प्रदेश केडरमधून महाराष्ट्रात दाखल झालेल्या अंजली रमेश यांची बदली करण्यात आली. नेहा भोसले यांची अवघ्या आठ महिन्यातच बदली करण्यात आली. त्यांनी आरोग्य केंद्रे, शाळांना भेटी देत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले.

नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी पदभार स्विकारला असून पहिल्याच दिवशी त्यांनी सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी घरकुल योजना, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपूरवठत्त योजना, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महिला व बालकल्याण विभागांतर्गत पोषण आहार व अंगणवाडी तसेच आरोग्य विभागांतर्गत आरोग्य केंद्रांचा आढावा घेतला.

यावेळी सर्व विभाग प्रमुखांना तत्परतेने आणि समर्पण भावनेने काम करण्याचे आवाहन केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, गणेश वाघ केशव गड्डापोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे आदींची उपस्थिती होती.

# एकास एमपीडीए कायद्यांतर्गत एक वर्षासाठी केले स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली यांनी जिल्हयाचा पदभार स्विकारताच जिल्हयातील सराईत गुन्हेगार व सतत गुन्हे करणाऱ्या विरुध्द कडक कार्यवाहीची भुमिका घेवुन अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपीची इत्यंभूत माहिती काढुन ते करत असलेल्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा, फौजदारी प्रक्रीया संहिता व एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जात आहे. धोकादायक इसम करण अशोक मुदीराज वय २३ वर्ष रा. गाडीपुरा हिंगोली ता. जि. हिंगोली यांचेवर मागील अनेक वर्षापासुन हिंगोली येथील पो.स्टे. हिंगोली शहर येथे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्दचे एकुण बारा (०८) गुन्हे दाखल असुन तो सतत गुन्हे करीत होता. तो समाजासाठी धोकादायक बनला होता. त्याचे कृत्यामुळे परिसरातील नागरीकांमध्ये भिती व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. तो गंभीर स्वरुपाचे दखलपात्र गुन्हे करीत असल्याने सामाजिक स्वास्थ्यास व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचविणारा धोकादायक इसम बनला होता. म्हणुन पोलीस अधीक्षक, यांचे आदेशाने सदर प्रकरण एन.बी. पाडळकर यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी अंबादास भुसारे यांच्या मार्फतीने नमुद इसमा विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यास आळा घालण्याबाबतचा अधिनियम १९८१ (एम.पी.डी.ए.) चे कलम ३ (१) अन्वये कार्यवाहीचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याकडे सादर केला होता. पोलीस अधीक्षक यांनी सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, यांच्याकडे पाठविला होता.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सदर प्रस्तावाची सविस्तर पडताळणी करुन नमुद करण अशोक मुदीराज हा सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरुन धोकादायक व्यक्ती बनल्यामुळे त्यास एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत एक वर्षाकरीता कारागृहात स्थानबध्दतेचे आदेश निर्गमीत केले असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

# हिंगोली मार्गे कोयम्बतूर ते भगत की कोठी रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**

रेल्वे क्रमांक ०६१८१ कोयम्बतूर येथून १० एप्रिल पासून दर गुरूवारी रात्री अडीच वाजता निघून काचीगुडा, नांदेड, पूर्णामार्गे हिंगोली येथे ११ एप्रिल ते ४ जुलैपर्यंत दर शुक्रवारी सकाळी ९ वाजता पोहचेल व पुढे वाशिम, अकोला, भुसावळ, जळगाव, नंदुरबार, सुरत, बडोदरा, अहमदाबाद, भिल्डी, मारवाड, जालौर, सामधारी आदी थांब्यासह राजस्थान राज्यातील जोधपूर येथील भगत की कोठी स्थानकावर ५ जुलै पर्यंत दर शनिवारी दुपारी ११.३० वाजता पोहचेल. या रेल्वेसेवेमुळे प्रवाशांना राजस्थान राज्यातील गड किल्ले पाहण्याची सुविधा होणार आहे.

परतीच्या प्रवासात रेल्वे क्रमांक ०६१८२ भगत की कोठी येथून दि १३ एप्रिल पासून दर रविवारी रात्री अकरा वाजता निघून आलेल्या मार्गाने हिंगोली स्थानकावरून दि १५ एप्रिल ते ८ जुलैपर्यंत दर मंगळवारी रात्री साडेबारा वाजता निघून पूर्णा, नांदेड, निजामाबाद, काचीगुडा, महबूबनगर, कर्नुल, ढोण, रेनीगुंटा, सेलम, इरोड, तिरूपूर आदी थांब्यासह तामिळनाडू राज्यातील कोयम्बतूर येथे दि ९ जुलैपर्यंत दर बुधवारी सकाळी नऊ वाजता पोहचेल. १८ डब्बे असलेल्या या रेल्वेत सात वातानुकुलीत इकॉनॉमी कोच, एक स्लीपर कोच, चार द्वितीय श्रेणीचे जनरल कोच जोडण्यात येणार आहेत. उन्हाळी सुट्ट्या, लग्नसराई तसेच धार्मिक व ऐतिहासिक आणि राजस्थान राज्यातील पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी या रेल्वेचा लाभ मिळणार आहे. याबबद्दल प्रवासी संघटनेचे अध्यक्ष धरमचंद बडेरा, जेठानंद नैनवाणी, गणेश साहू, डॉ विजय निलावार, आत्माराम खेडकर, भरतलाल साहू, प्रवीण पडघन, कुंडलीक सरकटे आदींनी रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहे. संघटनेकडून उदयपूर, पाटना, मदुराई एक्सप्रेस सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# श्रीराम कथास्थळी श्री सद्गुरू साई सेवा मंडळाकडून मोफत थंड पेय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ एप्रिल**



श्रीराम कथा ज्ञानयज्ञ स्थळी श्री सद्गुरु साई सेवा मंडळ यांच्या पुढाकाराने निशुल्क मोफत थंड पेय सेवा पुरविल्या जात आहे. मंडळाचे पदाधिकारी व सदस्य दैनंदिन नित्य सेवा करीत आहेत.

हिंगोली येथील मंगळवारा परिसरातील दत्तमंदिरात श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने श्रीराम कथा ज्ञानयज्ञ प्रवक्ता महामंडळेश्वर माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या उपस्थितीत सुरु आहे. श्रीराम कथास्थळी श्री सद्गुरु साई सेवा मंडळ यांच्याकडून मोफत थंड पेय भाविक भक्तांना वितरीत करण्यात येत आहे. याचबरोबर विक्की मुंदडा, धनंजय मेथेकर, राजु परशालु यांच्यासह अष्टभुजा महिला मंडळ दत्त गल्ली मंगळवारा येथील महिला भगिंनी मोफत थंड पेय वितरणात सहभागी आहेत. यामध्ये सुनिता काळे, कोमल जाधव, शकुंतला भोसले, अंजली भोसले, नंदा नंदनकर, नेहा चव्हाण, भाग्यश्री , दिपीका चौव्हाण, अरुणा पवार यांच्यासह महिला भगिंनी सहभागी आहेत. श्रीराम कथा सुरु झाल्यापासुन थंड पेयात कैरी पन, लिंबु शरबत, कोकाचे शरबत असे विविध थंड पदार्थ दैनंदिन नित्य बदल करीत भाविक भक्तांना वितरण करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड - शहरातील चैतन्यनगर-विमानतळ रस्त्यावरील रोहीत्रास आज बुधवारी दुपारी अचानकपणे आग लागली. या आगीत रोहीत्राशेजारी लावलेल्या चार दुचाकी जळून खाक झाल्या.

# देगलूरमध्ये मार्च एन्डच्या नावाखाली लाईनमनद्वारे प्रकल्पग्रस्तांची आर्थिक लूट

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.०२ एप्रिल**

लेंडी धरणासाठी आपल सर्वस्व गमावलेल्या धरणग्रस्तांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असतानाच एका नव्या समस्येने तोंड आ वासले आहे. रावणगाव पुनर्वसित नागरिक रस्ते व पाणी या सुविधांसाठी प्रशासनाकडे लढत असताना विजेच्या एका नव्या समस्येला तोंड द्यावे लागत असल्याची खंत प्रकल्पग्रस्त नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. कसेबसे जुन्या गावातून नागरिक पुनर्वसन रावणगाव येथे विस्थापित होत असतानाच राजू वाघमारे हा प्रकल्पग्रस्ताकडून कार्यवाहीच्या नावावर आर्थिक लूट करीत असल्याची चर्चा संबंध पुनर्वसित भागांमध्ये केली जात आहे. अनेकांनी कोटेशन भरूनही त्यांना मीटर मिळाले नाही. मात्र त्यांचे बिल अचानकपणे दिले जात आहे. वीज बिलाशिवाय कसे कळणार की आपणास बिल किती आले आहे? हा मोठा प्रश्न आहे. याशिवाय अनेकांची वीज बिल वीस ते तीस हजारांच्या वर दाखवली जात आहेत. वीस हजारांचे बिल होईपर्यंत संबंधित लाईनमन झोपला असावा का? असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. शिवाय यात एकदाच एवढी रक्कम भरावी लागणार अन्यथा आपले वीज कनेक्शन कापले जाईल अशी धमकी देऊन नागरिकात दहशत निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयास लाईनमन राजू वाघमारे याच्याद्वारे होत आहे. लोकांना विश्वासात घेऊन मीटर घेण्यासंबंधी समुपदेशन करण्याऐवजी धमकी वजा सूचनांचा वापर करीत असल्याने समस्त धरणग्रस्त नागरिक लाईनमन राजू वाघमारे यास वैतागली आहेत. तसेच एका नव्या समस्याला तोंड द्यावे लागत असल्याने विस्थापितांचा प्रश्न गंभीर बनला आहे.

नुकतेच राजू वाघमारे यास निलंबित करण्यासंदर्भात निवेदन ॲड. इर्शाद पटेल यांनी दिला होता. यावर विचारणा केली असता मार्च एंड असल्याने चौकशी करता आली नाही. लवकरच चौकशी करून कार्यवाही बाबत विचार केला जाईल. असे उत्तर कार्यकारी अभियंता उपविभाग देगलूर यांच्याकडून प्राप्त झाले आहे. शिवाय बंद असलेल्या डीपी बाबत बोलताना लगेच दुसऱ्या दिवशी माणूस पाठवला होता.

चालू झाले नाही का? असा अनभिज्ञ प्रश्न कार्यकारी अभियंताकडून प्राप्त झाले आहे. एकंदरीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही आदेश पाळले जात नसल्याचे यावरून सिद्ध होत आहे. तसेच संबंधितास निलंबित करण्यास एवढे कारण पुरेसे असल्याने तात्काळ कार्यवाही करावी. अशा मागणीने आता जोर धरला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### राजकीय मान्यवरांच्या काव्यवाचनाने रंगली मैफिल

**नांदेड**-राजकीय मंडळीचे व्यासपीठ म्हटलं की, एकमेकांबदलची राजकीय टीकाटिप्पणी, वैचारिक मतभिन्नता येवढेच अपेक्षित असते. मात्र विविध राजकीय पक्षांचे मान्यवर एकाच मंचावर येवून अप्रतिम काव्यवाचन करून मैफिल रंगवू शकतात याचा प्रत्यय सोमवार दि. ३१ रोजी बुद्धिजीवी प्रेक्षकांना अनुभवता आला. निमित्त होते मराठी अपडेटच्या वतीने आयोजित अभिजात मराठी उत्सव, राजकीय मान्यवरांचे काव्यवाचन हया कार्यक्रमाचे. दरम्यान यावेळी विविध विषयांवर भाष्य करणाऱ्या कवितेचे वाचन राजकीय मंडळींकडून साहित्य रसिकांना ऐकता आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले मराठी नववर्ष असल्याचे औचित्य साधून, मराठी अपडेटचे संस्थापक तथा काँग्रेस जिल्हाप्रवक्ते बापूसाहेब पाटील यांनी अभिजात मराठी उत्सव, राजकीय मान्यवरांचे काव्यवाचन हा कार्यक्रम सोमवार दि. ३१ रोजी मिनी सह्याद्री सभागृह येथे आयोजित केला होता. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते तथा माजी राज्यमंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारूख अहमद, काँग्रेस नेते प्रा. यशपाल भिंगे, भाजपा जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे, काँग्रेस प्रदेश सचिव सुरेंद्र घोडसकर, कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल पावडे, आदींच्या अप्रतिम काव्यवाचनाने साहित्य रसिक मंत्रमुग्ध झाले. यावेळी माजी उपमहापौर आनंद चव्हाण, संजय पाटील शेळगावकर आदीजन उपस्थित होते. दरम्यान राजकीय क्षेत्रातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष बंटी लांडगे आणि सहकार क्षेत्रातून मराठवाडा अर्बनचे अध्यक्ष उमेश पावडे यांना युथ आयकॉन सन्मानाने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य गीताने करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक तथा काँग्रेस जिल्हाप्रवक्ते बापूसाहेब पाटील यांनी प्रस्तावित केले तर सुत्रसंचालन ऋषीकेश कोंढेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शेख कलीम, दिंगाबर शिंदे, गोविंद पाटील, धनंजय उमरीकर आदींनी परिश्रम घेतले.

### भिमराव तुपसाखरे यांचे निधन

**उमरी**-उमरी तालुक्यातील सोमठाणा येथिल शेतकरीनिष्ट भिमराव



विठ्ठलराव तुपसाखरे यांचे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने दि. १ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नांदेड शासकीय दवाखान्यात विष्णुपूरी येथे उपचारा दरम्यान मुत्यू झाला आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ६० वर्ष होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि १ एप्रिल रोजीच ६:३० वाजता सोमठाणा बौद्धस्मशान भुमित झाला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तिन मुली, एक मुलगा, भाऊ नातवंड अस मोठा परिवार आहे सहशिक्षक धम्मानंद तुपसाखरे यांचे ते वडिल होत तर पत्रकार साहेबराव तुरेराव यांचे मेहूणे होते.

# अंतेश्वर बंधारा, धोंड प्रकल्प लिंबोटी धरण बचाव संघर्ष समितीचे एक दिवसीय आंदोलन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०२ एप्रिल**

लोहा तालुक्यातील अंतेश्वर बंधारा निर्माण करण्यात आला त्याच बंधाऱ्यातून अहमदपूर तालुक्यात पाणी पळविण्याचा घातलेला घाट संघर्ष समितीच्या माध्यमातून हणून पाडू. संघर्ष समितीला हालक्यात घेवू नका आमच्या मागण्या मान्य नाही झाल्या तर संघर्ष समितीच्या वतीने उग्र आंदोलन करू तुम्ही दिवसा पाईप लाईन करा आम्ही ती रात्री उखडून टाकू असा इशारा संघर्ष समितीच्या वतीने एकदिवसीय धरणे आंदोलन देण्यात

मागील कांहीं दिवसांपासून लोहा तालुक्यातील पाणी प्रश्न चांगलाच पेटला आहे. शेतकऱ्यांनी अंतेश्वर बंधारा, धोंड प्रकल्प ,लिंबोटी धरण, बचाव संघर्ष समिती गठीत केली १ एप्रिल रोजी तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन केले यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष लोह्याचे माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि. प. सदस्य अँड. विजय धोंडगे, माजी जि. प. सदस्य अँड. चंद्रसेन पाटील, बालाजी पांडागळे, माजी जि. प. सदस्य विठ्ठल शेटकर, कंधारचे माजी पं. स. सदस्य उत्तम चव्हाण, दत्ता कारामुंगे, बळी पाटील, गंगाप्रसाद यन्नावार, उत्तम चव्हाण,आदींसह प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.



अंतेश्वर येथे १५० कोटी निधीतून तत्कालीन आमदार शंकर अण्णा धोंडगे यांनी बंधारा उभारण्याचे काम केले. आज त्याच बंधाऱ्यावरून ४ हजार कोटी निधीतून ७० किमी अंतरावर लिफ्ट द्वारे अहमदपूर येथे पाणी नेण्याचे आदेश शासनाकडून निघाले आहेत. सदरील आदेश हा या भागातील शेतकऱ्यांवर अन्याय करणारा असून या भागातील आमदार यांनी या भागातील एक थेंब पाणी बाहेर नेऊ देणार नाही असे म्हणणारे आज उलट भूमिका घेत आहेत. येथील आमदाराची मतदारसंघाचा विकास नाही तर भकास करायचा आरोप केला. तसेच अहमदपूर येथील आमदाराला कारखाना चालविण्यासाठी पाणी पाहिजे त्यासाठीच खटाटोप असल्याचाही डॉ. धोंडगे यांनी आरोप केला.

अंतेश्वर बंधाऱ्याचे अहमदपूरला लिफ्टद्वारे जाणारे पाणी आदेश रद्द करावा, धोंड प्रकल्पास भरघोस निधी देवून शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध करावे, लिंबोटी धरणातील जय मल्हार उपसा सिंचन योजनेद्वारे माळेगांव व परिसरातील शेतीना पाणी द्यावे, रखडलेली कलांबर पृछ वितरिकेस मंजुरी द्यावी तसेच लोहा आणि कंधार तालुक्यातील पाणी इतरत्र जाऊ देवू नये आदी मागण्याचे निवेदन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्फत शासनाकडे देण्यात आले. बंधारा लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. सदर स्वाक्षरीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री व पाटबंधारे मंत्री यांच्याकडे देण्यात येणार आहे. १ मे पासून साखळी उपोषण आंदोलन, १५ जून पासून रस्ता रोको आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने करण्यात येणार आहे. कुठल्याही परिस्थितीत या भागातील पाणी अन्यत्र जाऊ देणार नसल्याचा पवित्रा संघर्ष समितीच्या वतीने घेतला आहे. सरकारने संघर्ष समितीच्या मागण्या मान्य नाही केल्यास आणि पाईप लाईन चे काम हाती घेतल्यास दिवसा करण्यात आलेली पाईप लाईन रात्री उखडून काढू असा सज्जड दम संघर्ष समितीच्या वतीने सरकारला भरला आहे. यावेळी बहुसंख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# लाडक्या बहिणींच्या पैशासाठी आता घरोघरी 'स्मार्ट मीटर'

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०२ एप्रिल**

महाराष्ट्र शासनाच्या लोकलूभावन योजना, वाढता अनुत्पादक खर्च आणि सरकारची विस्कटलेली आर्थिक घडी पाहता राज्यावर ९ लाख ३२ हजार कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर उभा आहे. यातच लाडक्या बहीण योजनेच्या निधी करिता सरकारने अनेक योजनेत आखडता हात घेतला असून त्याचा राज्याच्या विकास कामांवर मोठा परिणाम दिसून येणार आहे. यातच आता वीज मंडळाकडून घरोघरी स्मार्ट प्रिपेड मीटर बसविले जात असून ही योजना म्हणजे लाडकी बहिण योजनेच्या निधी वसुलीसाठी सरकारने आणली असल्याची चर्चा असून एका स्मार्ट मीटरसाठी तब्बल १२ हजार रु. मोजावे लागणार असल्याने लाडका दाजी मात्र बेज्जार आहे. ना कर्जमाफी, ना पीकविमा यामुळे चिंतातूर असलेला शेतकरी आता स्मार्ट मीटर योजनेने पूरता गारद होण्याची भीती शेतकरी व्यक्त



करीत आहेत! फडणवीस सरकारच्या नव्या वसुली फंड्याने राज्यातील आर्थिक परिस्थिती वाईट आहे, अशीच चर्चा आहे.

निवडणूकीच्या आश्चर्यकारक निकालाने राज्यात महायुतीला राक्षसी बहुमत मिळाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल 'यू टर्न' घेतला आहे. परंतू आता त्याच शेतकऱ्यांच्या घरी १२ हजार रुपयांचे स्मार्ट प्रीपेड मीटर लावले जाणार असून मोठमोठ्या कंपनी आणि उद्योगाच्या थकीत वीजबिलाच्या संदर्भात ब्र न काढणारे वीज मंडळाचे अधिकारी, पथके मात्र आज ग्रामीण भागात घरोघरी वीज गिरट्या घालत आहेत. त्यामुळे राज्याचा वाढता महसुली खर्च भागविण्यासाठी, लाडक्या बहीण योजनेचा खर्च वसूल करण्यासाठी आता लाडक्या दाजींना वेशीवर टांगले गेल्यास आश्चर्य वाटू नये.

सध्या राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट असून उत्पन्नाचे स्त्रोत कसे वाढवता येतील यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना कामाला लावले असले तरी लाडक्या बहीण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर तीस हजार कोटींचा भार वाढला आहे. सरकारने अनेक योजनातील पैसा लाडक्या बहीण योजनेकडे वळविल्याने त्या योजना सध्या लालफितीत अडकून पडल्या आहेत. यातच आता वीज विभागाकडून घरोघरी नवीन स्मार्ट मीटर बसविले जाणार असून यातून घसघशीत उत्पन्न वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत. एका मीटरसाठी १२ हजार वसूल केले जाणार असून या स्मार्ट मीटरमुळे वीज बिलही भरमसाठ वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याने ग्राहकांचे खिसे मात्र रिकामे होणार आहेत. या ग्राहकांत शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात असून शेतकरी अगोदरच कर्जबाजारीपणात अडकून असून ना कर्जमाफी, ना पीकविमा यामुळे तो अजूनच कर्जाच्या खाईत ढकलला जाणार आहे. त्यामुळे महायुती सरकारचे घरोघरी बसविले जाणारे स्मार्ट मीटर शेतकऱ्यांच्या व गोरगरिबांच्या मुळावर उठल्यास नवल वाटायला नको!

चौकट

राज्यात लाडक्या बहिणीच्या निधी वसुलीसाठी आता घरोघर स्मार्ट मीटर बसविले जाणार असल्याने लाडक्या दाजीची मोठी आर्थिक कोंडी होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कर्जमाफी नाकारली असल्याने शेतकरी अगोदरच चिंतेत सापडला असताना आता घरोघर 'स्मार्ट मीटर' बसविले तर शेतकऱ्यांना जगणेही मुश्कील होणार असल्याची भीती शेतकरी, मजूर व गोरगरीब वर्गातून व्यक्त होत आहे.

# निजामोदीन शेख चुडीवाले यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नायगाव बाजार, दि.०२ एप्रिल**

नायगांव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी जेष्ठ नागरिक निजामोदीन जैनोदीन शेख चुडीवाले वय ७२ वर्ष यांच दि.२ एप्रिल २०२५ रोजी बुधवारी सकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे.



निजामोदीन शेख यांच्या पार्थिवावर दि. २ एप्रिल रोजी बुधवारी सायंकाळी ५:३० वाजता नरसी ता.नायगाल जि. नांदेड येथे मुस्लिम कब्रस्तान मध्ये शोकाकुल वातावरणात दफन विधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुल, दोन मुली, सुना, जावाई, नातू असा मोठा परिवार आहे. ते रियाज शेख चुडीवाले व रायगड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक ईरफान शेख यांचे वडील होत. अंत्यविधीस गावातील नागरिक पाहुणे, मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशोदा हॉस्पिटलमध्ये गंभीर अन्ननलिका कॅन्सरवर उपचार



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०२ एप्रिल**

एसोफेजियल स्कॅमस सेल कार्सिनोमा म्हणजेच अन्ननलिकेच्या कॅन्सरने ग्रस्त तत्कालीन वय ३५ वर्षे असलेल्या रुग्ण उपेंद्र विष्णुपुरीकर यांच्यावर यशोदा हॉस्पिटल सोमाजीगुडा येथील सर्जिकल ऑनकॉलाजिस्ट (कर्करोग तज्ञ) डॉ. सचिन मर्दा यांनी तब्बल १३ वर्षापूर्वी यशस्वी एसोफेजेक्टॉमी. शस्त्रक्रियेव्दारे अन्ननलिकेचा सर्व किंवा काही भाग, पोटाचा काही भाग आणि जवळील लिम्फ नोड्स काढून टाकत रुग्णाच्या आतड्यापासून नवीन अन्ननलिका तयार करून जिवनदान दिले होते व तो रुग्ण आज तब्बल १३ वर्षा नंतर ठणठणीत आयुष्य जगत आहे अशी माहीती हॉटेल चंद्रलोक येथील आयोजित पत्रकार परिषेदेत डॉ.सचिन मर्दा व रुग्ण उपेंद्र विष्णुपूरीकर यांनी दिली.

यावेळी त्यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी तपासणीअंती ते अवघे ६ महीने जिवंत राहतील असे सांगण्यात आले होते त्यानंतर त्यांनी सोमाजीगुडा येथील यशोदा हॉस्पिटल गाठत सर्जिकल ऑनकॉलाजिस्ट (कर्करोग तज्ञ) डॉ. सचिन मर्दा यांच्या मार्गदर्शनात उपचारांस सुरूवात करण्यात आली. प्राथमिक तपासणी अंती तब्बल १२ तास चाललेल्या रोबोटीक सर्जरीव्दारे त्यांची कॅन्सरग्रस्त अन्ननलिका काढून टाकत आतड्यापासून नवीन अन्ननलिका प्रत्यारोपित करुन उपेंद्र विष्णुपुरीकर यांस जिवनदान दिले होते त्यावेळी ६ महीने आयुष्य सांगण्यात आलेले. उपेंद्र हे आजरोजी ५० वर्षाचे असून सर्वसामान्यपणे जिवन व्यतित करत आहेत. उपेंद्र विष्णुपूरीकर यांनी त्यांचे भाऊजी शिरीष पांडे, रवि पेशकार व टिम यशोदाचे विशेष आभार मानले. गरजू रुग्णांनी व कॅन्सर ग्रस्तांनी याचा लाभ घ्यावा. यशोदा हॉस्पिटल सोमाजीगुडा येथील वैदयकीय मदतीबद्दल तेथील जनसंपर्क अधिकारी राम देशमुख ७९९५५०४०२६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महसूल विभागाची 'जिवंत सातबारा मोहीम'

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०२ एप्रिल**

राज्य शासनाच्या महसूल विभाग १००दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत, दि.१ एप्रिल २०२५ पासून जिवंत सातबारा मोहीम, राबविण्यात येत असून सदर मोहिमे अंतर्गत सातबारा वरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.तरी जे खातेदार मयत असतील त्यांच्या वारसांनी अर्ज, वारसा बाबतचे प्रतिज्ञापत्र, पोलिस पाटील/ग्राम पंचायत दाखला, मृत्यू दाखला इ. कागद पत्रे आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांचे कार्यालयात पंधरा दिवसांत सादर करावेत असे आवाहन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

# भोकर येथे सर्वत्र रमजान ईद उत्साहात

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.०२ एप्रिल**

संपुर्ण भारतात गेल्या महिन्याभरापासून कडक उन्हात उपवास पाळलेल्या समस्त मुस्लिम बांधवांनी दि.३१ मार्च रोजी भोकर शहरात रमजान ईद, मक्का मस्जिद बिलाल मस्जिद,दारूल ऊलूम सिद्दीकीया येथे व तसेच खारी फहिमोद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह येथे सामूहिक नमाज पठन करुन समृद्धी शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भोकरचे तहसिलदार विनोद गुंडमवार पोलिस निरीक्षक अजित कुंभार, भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश पाटील भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंद बाबागौड पाटील कोंडलवार , ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी पाटील किन्हाळकर, राष्ट्रवादीचे भोकर तालुका अध्यक्ष राजेश्वर देशमुख, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर, भाजपा भोकर तालुका समन्वयक भगवान दंडवे, गणेश पाटील कापसे बटाळकर, सतिश देशमुख ,प्रमोद देशमुख कामणगावकर सुभाष पाटील गौड,शेख यूसूफभाई, सुरेश बिल्लेवाड, प्रहार जनशक्ती पक्षाचे भोकर तालुका अध्यक्ष ॲड. शेखर कुंटे, परशु पाटील डौरकर ॲड. शिवाजी कदम, जेष्ठ पत्रकार एल. ए. हिरे, संपादक उत्तम बाबळे,जेष्ठ पत्रकार अनिल डोईफोडे ,निळकंठ वर्षेवार, अप्पाराव राठोड, श्रीकांत पाटील, गजु पाटील सोळंके, के.वाय देवकांबळे आदीसह राजकीय सामाजिक प्रतिष्ठित नागरिकांनी इदगाह येथे उपस्थित होते. यावेळी पो.नि.अजित कुंभार, स.पो.नि. शेलेद्र औटे,कल्पना राठोड, पो.उप.नि. सुरेश जाधव ,राम कराड, प्रल्हाद बाचेवाड, परमेश्वर गाडेकर ,गुरूदास आरेवार आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बी.आर.आंबेडकर फाऊंडेशनचे पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०२ एप्रिल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने मागील २३ वर्षापासून डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने पत्रकारीता क्षेत्र तसेच राजकीय, सामाजिक, शिक्षण, सांस्कृतीक, साहित्य, आरोग्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देवून सन्मानित केले जाते. या वर्षीच्या पुरस्काराची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष बापुराव गजभारे आणि सचिव आकाश गजभारे यांनी संयुक्तरित्या पत्रकार परिषदेत केली.

सन २०२४-२०२५ चे पुरस्कार घोषित करण्यात आले असून राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना यावर्षीच्या डॉ.



बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. स्मृतीशेष कृष्णाबाई नागोराव गजभारे यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे कृष्णाई पत्रकारीता पुरस्कार प्रदिप नागापुरकर, राम तरटे, हाफीज घडीवाला (ग्रामिण) यांना जाहीर करण्यात आले आहे. पुरस्काराचे स्वरुप २५०००/- रु., १०,०००/- रु., ५,०००/- रु. व मानपत्र असे आहे. नव्याने सुरु करण्यात आलेला स्मृतीशेष मनोज गजभारे प्रज्ञावंत विद्यार्थी पुरस्कार यावर्षी आपल्या जिद्दीच्या बळावर शास्त्रज्ञ होत असलेल्या शितल संतोष गोमसकर या विद्यार्थीनीस जाहीर करण्यात आला आहे. लवकरच एका भव्य दिव्य कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या पत्रकार परिषदेस फाऊंडेशनचे उपाध्यक्ष सतिश बनसोडे, कुलदिप चिकाटे, पंढरीनाथ बोकारे, संघरत्न खंदारे, सतिश पांडवे, मोहन गर्दनमारे, साहेबराव सोनकांबळे, राजू पार्डीकर, इश्वरप्रसाद अग्रवाल, राजेंद्र शुक्ला आदि उपस्थित होते.

# महिला सरपंच नावाला अन् पती गाव कारभाराला

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०२ एप्रिल**

आरक्षणामुळे महिलांना सरपंचपदाचा हक्काचा वाटा मिळाला खरा, परंतू किती महिला सरपंच प्रत्यक्ष कामकाज सांभाळतात ? यावर प्रश्नचिन्ह निर्माण होतांना दिसते. किनवट तालुक्यात कांहीअंशी ग्रामपंचायतीत महिला सरपंचांच्या कारभारात पतीचा हस्तक्षेप वाढळून येतोय. महिला सरपंचांशिवाय अन्य व्यक्तींनी कारभार सांभाळू नये असा कायद्याचा दंडक असलातरी त्यास झुगारुन हमखास कामकाज करत असतील तर ग्रामपंचायत अधिकारी/ग्रामविकास अधिकाऱ्यांनी




रोखवायला पाहिजे. गोकुंदासह कांही ग्रामपंचायतींचा कारभार त्या विळख्यात कांहीअंशी अडकला असल्याने तशा ग्रामपंचायतींच्या कारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. तालुक्यात १३४ ग्रामपंचायती आहेत. कांही ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच आहेत. तशा सरपंचांयतींच्या कारभारात त्यांच्या कुटूंबातील लोकांचा हस्तक्षेप होऊन तेच कारभार सांभाळत असतील तर त्याचा परिणाम पहायला मिळतोय. मासिकसभा, ग्रामसभा घेतल्या जातेच यावर गोकुंदावाशियांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याचे अनेकांनी बोलून दाखवले. ग्रामपंचायत अधिकारी या व्यवहाराचे साक्षीदार असल्याने त्यांनी या प्रकारावर आळा घालायला हवा अन्यथा अंबाडी ग्रामपंचायतीला ग्रामपंचायत अधिकाऱ्याने सभागृहाला डावलून हेकेखोरी केल्याने सदस्यवृंदांनी ग्रामपंचायतीला कुलूपही ठोकले आणि काढजल्याचे वृत्त आहे. भविष्यात त्याची इतरत्र पुनरावृत्ती होणार नाही याची गटविकास अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी होतांना दिसते.

किनवट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी असून अडचण नसून खोळंबा अशी दिसते. ग्रामपंचायतींच्या बोगस गावठाण प्रमाणपत्राविरुद्ध अनेकदा तक्रारी झाल्या परंतू गटविकास अधिकार्यांनी मात्र त्यावर कारवाई करण्याचे धाडस दाखवले नाही. मूळ गावठाण आणि सुधारीत दोनशे मिटरच्या अध्यादेशानंतरही एक-एक किमी लांब पल्यावरच्या नगर रचना विभागाची आणि तहसिल प्रशासनाची नव्हे तर ग्रामपंचायत स्तरावरच ले-आऊटला मंजुरी देऊन मूळ गावठाणक्षेत्रा बाहेरील प्लॉटला बोगस गावठाण प्रमाणपत्र हे ग्रामपंचायत अधिकारीच देतात की, सरपंचांची त्यास मुकसंमत्ती आहे? याचा उलगडा व्हायला पाहिजे. दहा-दहा, पंधरा-पंधरा हजार रुपयाला एक गावठाण प्रमाणपत्र विकल्या जात आहे. सरपंचांची तर भेट होत नाही. सरपंचपतींशी संपर्क करुन प्रकरण अवगत केल्यानंतरही थांबवण्याचा प्रयत्न केलेला नाही. यांच्याच संगनमतातून सरपंचांना बाजुला ठेऊन प्रमाणपत्र विक्री होत असेल गटविकास अधिकाऱ्यांनी का हस्तक्षेप करु नये? असा तमाम नागरीकांचा सवाल आहे.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# गेवराईच्या श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ एप्रिल**

शहरातील श्रीराम मंदिर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळयात रविवार दि.३० मार्च ते दि.७ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी श्रीराम भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थान व श्रीराम भक्त मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



प्रभु श्रीरामचंद्र जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिर, गेवराई येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी रुद्राभिषेक व घट स्थापना, मंगळवार दि.०१ एप्रिल रोजी श्री.डॉ.मुकुंद महाराज मुरलीधर (गोंदीकर) यांचे संगीत भागवत कथा दुपारी १२ ते ०५ पर्यंत व श्री. विष्णु महाराज बांडे (युटचुब स्टार) यांचे भारुड सायं.७:३० वा, बुधवार दि.०२ एप्रिल रोजी कु.सिध्देश्वरी कोकाटे (संगीत विशारद) यांचे सायं.७:३०वा.स्वरांजली संगीत रजनी , गुरुवार दि.०३ एप्रिल रोजी ह.भ.प. आशाताई चपळगांवकर यांचे सायं.७:३० वा. कीर्तन, शुक्रवार दि.०४ एप्रिल रोजी रामायणाचार्य ह.भ.प.प्रेमलताई डेंगळे यांचे सायं.७:३० वा. किर्तन, शनिवार दि.०५ रोजी सायं. ७:३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम (नृत्य, नाटिका, संगीत स्पर्धा) , रविवार दि.०६ एप्रिल रोजी श्री.ह.भ.प.पांडुरंग महाराज गव्हाणे (आळंदीकर) यांचे सकाळी १० वा. काल्याचे किर्तन तर सोमवार दि.७ एप्रिल रोजी दुपारी ०१ ते ०५ दरम्यान भागवत कथा समाप्ती व नंतर महाप्रसाद देण्यात येईल तरी श्रीराम भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक संस्थान श्रीराम मंदिर व श्रीरामभक्त गेवराई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खोलेश्वरच्या श्रृती शिंदेची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ एप्रिल**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील इ.७ वी तील विद्यार्थ्यीनी कु.श्रृती बबन शिंदे हिची बेंगलोर येथील इस्त्रो केंद्रात जाणाऱ्या अभ्यास सहलीसाठी निवड झाली आहे.इस्कॉन मंदिर लातूर च्या वतीने आयोजित भगवत गीतेवरील मूल्यशिक्षण परीक्षेत श्रृतीचा बीड जिल्ह्यात सर्व प्रथम क्रमांक आल्याने तीची या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे.



तिच्या या यशाबद्दल तीचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष.डॉ.सुरेंद्रजी आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांतराव मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,सर्व शालेय समिती सदस्य, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# अद्वैत राजेंद्र डुबे एमबीबीएस उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

परळी येथील प्रसिध्द व्यापारी राजेंद्र डुबे यांचा मुलगा अद्वैत डुबे हा वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस परिक्षा उत्तीर्ण झाला असुन याबद्दल त्याचा पायोनियर डिस्टीब्युटर्सच्या कर्मचार्यांनी सत्कार केला.

परळी येथील भाजपाचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे यांचे पुतणे पायोनियर डिस्टीब्युटर्सचे संचालक राजेंद्र डुबे व पत्नी सौ.सविता राजेंद्र डुबे यांनी पायोनियर डिस्टीब्युटर्स घ्या माध्यमातून परळीच्या औषधी क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देत आपल्या मुलाला शैक्षणिक क्षेत्रात घडवले.चिरंजीव अद्वैत याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण परळी येथील भेल सेकंडरी स्कुल येथे तर महाविद्यालयीन शिक्षण छत्रपती शाहु कॉलेज लातुर येथे झाल्यानंतर वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस पदवीसाठी त्याची केईएम मेडिकल कॉलेज मुंबई येथे निवड झाली.याचा नुकताच



निकाल लागला असुन यात तो उत्तीर्ण झाला.एमबीबीएस उत्तीर्ण झाल्यानंतर चि.अद्वैत परळी येथे आल्यानंतर त्याचा आई वडिलांसह पायोनियर डिस्टीब्युटर्सचे कर्मचारी वैभव कुरकुट,आकाश शेळके,कृष्णा भारती,अनंत जमशेटे संकेत शेलार,अशोक मोरे,राजू शहाणे,सचिन कुंभार आदींनी सत्कार करत पुढील वैद्यकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेस ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाखांचा नफा

## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ एप्रिल**

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसुत्रीनुसार कार्यरत असलेली दीनदयाळ नागरी सहकारी बँक मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात मागील २८ वर्षांत नांवारूपास आली आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणाऱ्या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाख रूपयांहून अधिकचा करपूर्व नफा झाला असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२५ (आर्थिक वर्ष २०२४ - २०२५) अखेर आर्थिक वर्षासाठीचे अलेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे कोटीत आहेत.) एकूण संकलित ठेवी (५६०.४०), कासा ठेवी प्रमाण - २७.४१ टक्के, एकूण वितरीत कर्जे (३३१.१६), एकूण गुंतवणुक (१७४.०२), भागभांडवल (१७.०३), एकूण गंगाजळी (३८.९९), निव्वळ ढोबळ मालमत्ता (५६.०२), खेळते भांडवल (६४१.१३), बँकेने एकूण (८९१.५५) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ४७ लाख इतका निव्वळ करपूर्व नफा झाला आहे. तर ढोबळ अनुत्पादक कर्जे (२३.७८), अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ७.१८ टक्के एवढे आहे. आणि नक्त अनुत्पादक कर्जे १.५३ टक्के (ता.क. - वार्षिक लेखा विवरण असल्याने उपरोक्त आकडेवारीत लेखापरीक्षणाप्रमाणे अंशतः बदल संभवतो.) दीनदयाळ बँकेचे संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे कार्यक्षेत्र आहे. तसेच बँकेच्या संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १७ एवढ्या शाखा कार्यरत असून अंबाजोगाई येथे बँकेचे अद्ययावत मुख्य कार्यालय हे स्वत:च्या मालकीच्या भव्य इमारती मध्ये कार्यरत आहे. बँकेच्या वतीने प्रतिवर्षी युगपुरूष स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. मागील २३ वर्षांपासून राज्यातील व राज्याबाहेरील अनेक नामवंतांनी आपल्या अमोघ वाणीने अंबाजोगाईकरांना, ज्ञान, अध्यात्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक मेजवानी दिलेली आहे. याआधी वृक्षारोपण तसेच पाणी टंचाईच्या काळात बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला आहे. मुक्या जनावरांसाठी बँकेच्या वतीने पाणपोईची सुविधा करण्यात आलेली होती.



मागील काही वर्षांत बँकेच्या मुख्यालयास सुप्रसिद्ध समाजसेवक, आर्थिक व व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील जाणकार, शिक्षण तज्ज्ञ, सिने व नाट्य कलावंत, लेखक, व्याख्याते, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्ती, आर.बी.आय.चे वरीष्ठ अधिकारी या मान्यवरांनी वेळोवेळी बँकेस भेटी देवून आपले अभिप्राय नोंदविले आहेत. कोविड सारख्या संकटकाळात तसेच सातत्यपूर्ण सर्व ग्राहकांना दर्जेदार व तत्पर बँकिंग सेवा दिल्याबद्दल ग्राहकांच्या वतीने बँकेस वेळोवेळी लेखी प्रशंसा व गौरवपत्र प्राप्त झालेले आहेत. तसेच दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात २०२३ साली मानाचा तुरा रोवला गेला आहे. तो म्हणजे बँकेच्या सर्वांगिण कार्याची दखल घेऊन सलग दुसऱ्या वर्षी ४०० ते ५०० कोटी रूपयांच्या ठेवी जमविलेल्या गटात दीनदयाळ बँकेस 'बँको ब्ल्यू रिबन' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने यापूर्वी गौरविण्यात आले आहे. बँकेने नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. तत्पर व दर्जेदार बँकींग सेवा, सुविधा उपलब्ध करून देत दीनदयाळ बँकेने सहकार क्षेत्रात 'बिना संस्कार, नही सहकार' हा संस्कार जोपासला आहे. एक परिवार म्हणून काम करताना 'विश्वास, विकास आणि विनम्रता' हे ब्रीद घेऊन आश्वासक प्रगती साधली आहे. सध्या बँकेच्या मराठवाड्यात अंबाजोगाई, माजलगाव, परळी वैजेनाथ., पालम, परळी रोड, नांदेड, उदगीर, लातूर, देगलूर, परतूर, धारूर, नायगांव बाजार, परभणी, छत्रपती संभाजीनगर, अहमदपूर, जालना, बीड या ठिकाणी शाखा असून सुरूवाती पासूनच सामाजिक बांधिलकी मानून ही बँक आर्थिक क्षेत्रात कार्यरत आहे. संपूर्ण संगणकीकृत बँकींग सेवा दीनदयाळ बँक पुरविते, रूपे ए.टी.एम.ची तथा युपीआयची सेवा ही उपलब्ध आहे. बँकेच्या ए.टी.एम.मशीन मध्ये इतर सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे ए.टी.एम.कार्ड वापरता येतात. बँकेच्या सर्वांगीण विकासात बँकेच्या संचालिका तथा महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या खात्याच्या सन्माननीय कॅबिनेट मंत्री महोदया ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तर संचालक रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तसेच आर.बी.आय., सहकार खात्याचे आयुक्त, तथा निबंधक, उपनिबंधक, सहायक निबंधक तसेच बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आदींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ऍड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दीनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर म्हणाले की, ३१ मार्च २०२५ अखेर प्रत्येक बँकरला उत्कंठा असते ती अंतिम आर्थिक निकालाची वर्ष आलं तसं जात असतं. परंतू, वर्षभरात केलेल्या प्रयत्नांचे जणू उत्तरच मिळावे. तो आनंद, ते समाधान आणि नव्या आर्थिक वर्षाची नांदी, अशा संमिश्र भावनांची गर्दी मनात होते. पण, या भावनाच मनाला निश्चितच उभारी देऊन जातात. मार्च - २०२४ पासून ते मार्च - २०२५ पर्यंतचा कालावधी हा सर्वार्थाने नफा - तोटा पत्रकावर परिणाम करणारा होता, आपण सर्वजण हे जाणताच, त्यातही यावर्षी प्रामुख्याने ठराविक महिन्यांचा कार्यकाल, तशातच अनेक अडचणी, कर्मचाऱ्यांचे आजारपण, हे सर्व असताना ही 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीची अनुभूती यावी व 'टीम-वर्क' काय असते त्याचे उत्तर मिळावे. तसेच मा.संचालक मंडळाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांचे टीमवर्क, संस्थेविषयीचे प्रेम व निष्ठा. खातेदारांचा उत्साह, सभासदांचे योगदान आहे. यामुळेच की काय या मंदीच्या कालावधीत ही बँकेने चांगला परफॉर्मन्स केला आहे. अर्थातच हे सर्व सांगण्यामागचे प्रयोजन अभिनंदन करावे हेच आहे. या सर्व अडचणींतून मार्ग काढत आमचे सहकारी, शाखाधिकारी ते सर्व शिपाई व मुख्यालयातील विभागप्रमुख व सहकारी यांचे सामुहिक प्रयास, योगदान हे या आर्थिक निकालाचे मानकरी आहेत. हे येथे निश्चितच उल्लेखनीय होय. चरितार्थ चालविण्यासाठी काम करावेच लागते, संस्थेचा उत्कर्ष हे उद्दिष्ट समोर ठेवून सातत्याने प्रयत्नरत असावे, हा आपल्या कार्यामागील प्रपंच असावा. नव्हे तोच आपल्या कार्याचा मुख्य आधार असावा. सर्वांचे हार्दिक अभिनंदन व बँकेसाठी पुढील आर्थिक वर्ष २०२५ - २०२६ हे ही उत्कृष्ट निकालाचे वर्ष ठरावे यासाठी मनस्वी शुभेच्छा..!

# पूर्णवादी बँकेस ८ कोटी ७६ लाखाचा नफा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

पूर्णवादी नागरिक सहकारी बँक म., बीड ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य बँक असून बँकेने प्रति वर्षा प्रमाणे आपल्या आर्थिक कामगारीचा आलेख उंचावत ठेवला आहे.२०२४-२५ या आर्थिक वर्षात बँकेला बँकेचे जेष्ठ संचालक डॉ.अरुणदादा निरंतर यांच्या मार्गदर्शना खाली व नूतन अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी यांचे नेतृत्वात रू. ८ कोटी ७६ लक्ष एवढा भरघोस नफा झालेला असून मागील वर्षाच्या तुलनेत १ कोटी २० लाख वाढ झाली आहे. दि. ३१/०३/२०२५ रोजी आर्थिक वर्षाअखेर बँकेच्या एकुण ठेवी रू. ८९७.१८ कोटी एवढ्या असून कर्जे रू. ५३७.४४ कोटीची आहेत.



बँकेचा एकत्रित व्यवसाय १४३४.६२ कोटींचा झाला असून एकत्रित व्यवसायात ११० कोटीची वाढ झाली आहे. बँकेचे भागभांडवल रू. २८.४८ कोटी असून बँकेची नेटवर्थ रू. ६३.६७ कोटी एवढी आहे तर बँकेच्या नेट एन.पी.ए.चे प्रमाण केवळ ०.६० % इतके आहे जे की नगण्य असल्याची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी दिली तसेच त्यांनी सांगितले की, बँकेच्या या यशात बँकेचे सर्व सन्मानीय सभासद, ग्राहक, संचालक व सर्व कर्मचारी वृंदाचे फार मोठे योगदान आहे. बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष जोशी यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली तसेच बँकेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ अरुणदादा निरंतर यांचे मार्गदर्शनाने, उपाध्यक्ष डॉ.लक्ष्मीकांत पारनेरकर व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे अध्यक्ष सी.ए.एस.पी.लड्डा व सर्व संचालक यांचे साथीने बँकेने सर्व आघाडींवर प्रगती साधून ग्राहकांचा बँकेवरील विश्वास अभेद्य ठेवून केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे.

# श्री छत्रपती राजर्षी शाहु बँकेस २६ कोटी ०९ लाखाचा भरघोस नफा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

बीड येथील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य नामांकित बैंक ज्या बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असून एकुण ४६ शाखा असलेली श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप बँक लि. बीड या बँकेस ३१ मार्च २०२५ अखेर रु. २६ कोटी ०९ लाखाचा भरघोस नफा मिळाला आहे. ३१ मार्च २०२५ अखेर बँकेच्या एकुण ठेवी रु.१४८४०१.४५ लक्ष, कर्ज रु. ८७००९. ८६ लक्ष एकुण भाग भांडवल रु. ४२६२.२८ लक्ष, बँकेचे सभासद संख्या २०८२२ एकुण व्यवसाय रु. २३५४११-३१ एवढा असुन बँकेस ढोबळ नफा रु. २६०९. २६ लक्ष झाला आहे.

बँक स्थापना दिनाचे औचित्याच्या निमित्ताने ग्राहक सेवेत व्ह्युओन्ली इंटरनेट बँकींग सेवासुरु केली असता एकाच दिवशी ८५० ग्राहकांनी या सेवेची नोंदणीकरून लाभ घेतला. बँकेस मिळालेला भरघोसनफा व ग्रॉस एनपीए २.४७% असून बेट एनपीए ०% (शुन्य टक्के) आहे. सर्व सभासद, कर्जदार, ठेवीदार, ग्राहक, खातेदार हितचिंतक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामुळेच मिळाला असुन बँकेचे अध्यक्ष मा. इंजि. अजय अर्जुनराव पाटील, उपाध्यक्ष व सर्व संचालकमंडळाच्या वतीने सर्वांचे आभार मानले आहे.

# निजाम यांचा शिवसेनेने सन्मान राखला, त्यांच्याकडे त्याग, संयम, स्थिरता नाही

**जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांची खंत**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

शिवसेना पक्ष हा निष्ठावंत शिवसैनिकांच्या ताकतीवर आज ही भक्कम टिकून आहे. इतर पक्षातून येणाऱ्यांना उद्धव साहेबांनी तेव्हढाच सन्मान दिला. बीड चे शेख निजामही याला अपवाद ठरले नाहीत.



एम आय एम मधून शिवसेनेत प्रवेश केला आणि बीड शहर प्रमुख पद मिळवले. परंतु त्यांच्याकडे निष्ठावंत शिवसैनिका प्रमाणे त्याग, समर्पण, संयम व स्थिरता नही. अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षाने त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असा उपरोधीक टोला जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लागवला आहे.

शेख निजाम शिवसैनिक केव्हाच नव्हते. परंतु एक मुस्लिम चेहरा असल्यामुळे पक्षाने त्यांचा एका शिवसैनिका प्रमाणे सन्मान राखला. त्यांना शहर प्रमुख केले. या उलट शेख निजाम यांनी पक्षाला काय दिले असा सवाल आज शिवसैनिक करत असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. आज अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेख निजाम प्रवेश करत असुन दादांनी निजाम यांच्या सर्व अपेक्ष पूर्ण कराव्यात व त्यांना स्थिरता द्यावी.

# ३१ मार्चला आर्थिक पत्रके जाहीर करण्याची आधार मल्टीस्टेटची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ एप्रिल**

नातं कुठलंही असो त्याची सुरुवात विश्वासातून होते आधार मल्टीस्टेटचा प्रथम आणि एकमेव ध्येय म्हणजे विश्वास विश्वास हा आम्ही आमच्या काळजाच्या तिजोरीत जिवापाड जपतो विश्वास सुरक्षा गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचं काम आधारणे आजपर्यंत केले आहे करत आहे व यापुढेही करत राहणारच आहे आजवर सर्व सभासदांनी आधार वर विश्वास टाकल्यामुळे आम्ही प्रगतीपथावर यशस्वी वाटचाल करीत आहोत.

शहरी ग्रामीण उपेक्षित वंचित व स्त्रिया या सर्वांनाच आदरणीय तात्काळ मदतीचा हात दिला आहे विविध लाभदायी योजना आधुनिक बँकिंग आणि संपूर्ण सुरक्षा यामुळेच आधारे मोठा पल्ला गाठला आहे आणि याच संपूर्ण श्रेय आमच्या सभासदांना व आमच्यावर विश्वास असणाऱ्या सर्वांनाच आहे ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे भाग भांडवल दोन कोटी वीस लाख झाले आहे सोनिधी तीन कोटी २५ लाख ठेवी ४६ कोटी गुंतवणूक १६ कोटी एकूण कर्जवाटप ३१ कोटी



शिडी रशो ६०% एकूण संमिश्र व्यवसाय ७६ कोटी रुपये आणि वर्षा अखेर निव्वळ नफा तीस लाख झालेला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड.सुनिल सौंदरमल यांनी सांगितले.


आधार मल्टीस्टेट ही मराठवाड्यामध्ये दीपस्तंभ सारखे कार्य करत आहे हे केवळ आमच्यावर विश्वास टाकलेल्या सर्व सभासदांमुळे शक्य झालेले आहे म्हणून मी याचं सर्व श्रेय माझ्यावर विश्वास टाकलेल्या सर्व सभासद संचालक कर्मचारी यांना देतो.

# चकलांब्यात यंदा वस्त्रहरण;चैत्र पौर्णिमेची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड गाजलेलं, मच्छिंद्र कांबळी यांचं 'वस्त्रहरण' हे धमाल विनोदी मालवणी नाटक मराठी भाषेत पुन्हा एकदा रंगभूमीवर धूमशान घालण्यास सज्ज होत आहे. या नाटकाचे आजवर ५२५४ प्रयोग झाले असून, लवकरच या नाटकाचा ५ हजार २५५ वा प्रयोग सादर होणार आहे. विशेष म्हणजे चकलंबा येथील कलाकारांच्या संचात या नाटकाचे मोजके ४४ प्रयोग केले जाणार आहेत.मराठी भाषेत रूपांतरित असलेले हे नाटक बघण्याची उत्सुकता लागली आहे,दि १२ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमाच्या दिवशी रात्री ८ वाजता हा नाट्य प्रयोग सादर होणार आहे.

१६ फेब्रुवारी १९८० साली कै. मच्छिंद्र कांबळी यांनी, गंगाराम गवाणकर लिखित 'वस्त्रहरण' या नाटकाचा पहिला प्रयोग केला होता. व्यावसायिक मराठी रंगभूमीवर इतिहास घडवलेल्या आणि अनेक दिग्गजांकडून वाहवा मिळवणाऱ्या 'वस्त्रहरण' या अजरामर कलाकृतीला १६ फेब्रुवारी,२०२५ रोजी ४५ वर्षे पूर्ण झाली.दि १२ एप्रिल रोजी चकलंबा येथे चित्र पोर्णिमेनिमित्त हे नाटक पुन्हा रसिकांच्या भेटीला येत आहे. येत्या चैत्र पौर्णिमेला हे नाटक चकलांबा रंगभूमीवर गावातील कलाकार संदिप पारगावकर,डॉ.विजय सुलाखे,प्रा.सतीश सुलाखे, रविंद्र कानडे,सुभाष चोपडे , उदय सुलाखे,कालिदास चोपडे ,सुरेंद्र सुलाखे,दर्शन नाईक,किशोर खेडकर,मयुर कुलकर्णी,श्याम कोळसे , ऋषिकेश सुलाखे,शुभम चोपडे,कृष्णा कुलकर्णी, उन्मेष सुलाखे,महिला कलाकार -मंजुश्री जोशी,आशा तारे हे कलाकार हा प्रयोग सादर करणार आहेत,नाटकाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरलेलं असं म्हटलं जातं.या नाटकाचे लेखक गंगाराम म.गवाणकर आहेत.या नाटकात कलाकारांना नेपथ्य व संगीताची उत्तम साथ लाभते.या नाटकात प्रवेश असून कथा ४४ वर्षे जुनी आहे,या नाटकाने चकलांबा येथील रंगमंच आणि रसिकांसाठी मनोरंजनाचे आगळेवेगळे नवे दालन उघडे केले आहे.नाटकाचे दिग्दर्शन इंजि.संतोष पारगावकर करत आहे तर ,सूत्रधार म्हणून धनंजय सुलाखे,संगीत दिग्दर्शन प्राध्यापक सतीश सुलाखे,संपादक प्रशांत सुलाखे,पुजा सुलाखे/सराफ, अर्णव सुलाखे करणार आहेत.सर्व प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळ चकलंबा यांनी केले आहे.




बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com